रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक १०० ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मुंबईतील ठाकरेंचे संभाव्य शिलेदार

**मुंबई :** मुंबईतील ३६ जागांसाठी महाविकास आघाडीत सध्या बैठका सुरू आहेत. लवकरच इथल्या जागांबाबत अंतिम फॉर्म्युला समोर येणार आहे. तत्पूर्वी, शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे गटाचे संभाव्य उमेदवार कोण असतील ती यादी समोर आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने सगळ्याच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडूनही संभाव्य उमेदवारांची यादी समोर आली आहे. त्यात आदित्य ठाकरे पुन्हा एकदा वरळीतूनच निवडणुकीला उभे राहण्याची शक्यता आहे.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ६ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹







# गणेशभक्त ‘टोलमुक्त’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना गुरुवार, दि. ५ ते १९ सप्टेंबर या कालावधीत टोलमाफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यासंबंधीचा शासन निर्णय मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर प्रसिद्ध करण्यात आला आहे. मुंबई-बंगळुरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील टोलनाक्यांवर ही सवलत लागू असणार आहे.

गणेशोत्सव हा सण कोकणातील सर्वात मोठा सण आहे. संपूर्ण कोकणामध्ये गणेशोत्सवाचे वातावरण हे वेगळेच असते. लाखोंच्या संख्येने मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई, पुणे शहरातील कोकणवासीय चाकरमानी गणेशोत्सवासाठी जातात. कुटुंबासह हा सण साजरा करतात. त्या चाकरमान्यांचा विचार करत राज्य सरकारने घेतलेला टोलमाफीचा निर्णय महत्वाचा आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य पान २ वर

### कुठे टोल नाही?

**मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-बंगळुरु महामार्ग तसेच इतर सर्व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीत असलेल्या टोलनाक्यांवर गणेशभक्तांना टोल माफ केला जाणार आहे. राज्य सरकाराच्या वतीने शासकीय परिपत्रक काढून टोल प्रशासनाला आदेश देण्यात आलेले आहेत.**

### मोफत पाससाठी कुठे संपर्क?

**गणेशोत्सवासाठी गावी निघालेल्या गणेशभक्तांच्या सर्व गाड्या आणि राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या बसेसदेखील टोल नाक्यावर मोफत सोडल्या जाणार आहेत. मोफत पास सवलतीसाठी संबंधित वाहतूक विभागाकडे संपर्क करावा, असे आवाहन राज्य सरकारकडून करण्यात आले आहे.**

### गणेशोत्सव, कोकण दर्शन नावाचे स्टीकर्स

**कोकणात जाणाऱ्या वाहनांना ‘गणेशोत्सव-कोकण दर्शन’ या नावाचे स्टीकर पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. टोल सवलतीचा हा कालावधी दि. ५ ते १९ सप्टेंबर असा सुमारे पंधरा दिवसांचा असेल. यासाठी स्थानिक पोलीस ठाणे व प्रादेशिक परिवहन विभागाकडे वाहनांची नोंदणी करून त्यांच्याकडून वाहनांवर लावण्यासाठी स्टिकर घ्यावे लागणार आहेत. पुण्याहून निघाल्यानंतर चिपळूणकडे जाणारी वाहने कराडपासून पाटणमार्गे रत्नागिरी, राजापूरला जाणारी वाहने किणी-वाठार वारणानगर-कोडोलीमार्गे आंबा घाटातून जातील.**



# शेतकऱ्यांसाठी लढणार

- **अतुल म्हात्रे यांचे प्रतिपादन**
- **गेलविरुद्ध उपोषणाला शेकापचा पाठिंबा**



**शासन व गेल कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून जर पाईपलाईनचा मार्ग बदलला नाही, तर गणेशोत्सवानंतर शेतकरी तीव्र आंदोलन करतील, असा इशारा दिला आहे.**

**। पेण । प्रतिनिधी ।**

गेलविरुद्ध उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचा पाठिंबा असून, शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढणार असून, गेलचा आराखडा बदलण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार, असे प्रतिपादन शेकापचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांनी दिले. कंपनीविरोधात २४ गाव सेझ संघर्ष समितीच्या माध्यमातून शेतकरी आक्रमक झाले असून, प्रांत कार्यालयाबाहेर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन अतुल म्हात्रे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

अतुल म्हात्रे यांनी सांगितले की, गेल कंपनीचा आराखडा बदलणे गरजेचे आहे. कारण, आताच्या आराखड्यात शेकडो शेतकरी बाधित होत आहेत. जर पाईपलाईनचा मार्ग बदलला, तर शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही. पूर्ण पाईपलाईन समुद्राच्या किनाऱ्याने नेल्याने गेल कंपनीचा हेतू साध्य होईल. तसेच शेतकऱ्यांची जमीनसुद्धा वाचेल. म्हणून मी सर्वतोपरी आराखडा बदलण्यासाठी प्रयत्न करणार असून, पान २ वर

# गणेशोत्सवात सुरक्षेसाठी उपाययोजना करणार

**शेकापच्या मानसी म्हात्रे यांच्या सूचनांची प्रशासनाकडून दखल**




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने महामार्गावर लावण्यात येणाऱ्या फलकांवर जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे. अलिबाग स्थानकात सुविधा केंद्र उभारण्यात आले आहेत. महिला सुरक्षेच्या दृष्टीने गस्त वाढविण्यात आली आहे. शेकापच्या राज्य महिला आघाडी प्रमुख तथा जिल्हा शांतता कमिटी सदस्या अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांनी केलेल्या सूचनांची दखल जिल्हा प्रशासनाने घेण्यास सुरुवात केली आहे. त्याची कार्यवाहीदेखील सुरु झाली आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गावर शुभेच्छा देण्यासाठी वेगवेगळ्या मंडळींकडून स्वतःचे फलक लावण्यात आले आहेत. काही ठिकाणी हे फलक लावण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रमाणापेक्षा मोठे फलक लावले जातात. यावर बंदी आणणे आवश्यक आहे. त्या फलकाद्वारे दुसऱ्या पान २ वर



# यंदाही चाकरमान्यांचा प्रवास खड्ड्यांतूनच

**। महाड । प्रतिनिधी ।**

यंदा ७ सप्टेंबर रोजी गणरायाचे आगमन होत आहे. कोकणातील या भव्य गणेशोत्सवासाठी चाकरमानी कोकणात दाखल होऊ लागले आहेत. यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा दिसू लागले आहेत. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम संथ गतीने सुरू असल्याने यावर्षीदेखील कोकणातील चाकरमान्यांना या खड्डे रस्त्यांचा त्रास होणार आहे.

गणेशोत्सव कोकणामध्ये मोठ्या भव्यदिव्य स्वरूपामध्ये साजरा केला जातो. नोकरी, व्यवसायानिमित्त मुंबई, ठाणे, सुरत, अहमदाबाद, पुणे अशा महाराष्ट्रातील विविध शहरात असलेले चाकरमानी गणेशोत्सवासाठी आवर्जून आपल्या गावात दाखल होतात. गेली दोन दिवसांपासून मुंबई-गोवा महामार्गावर या चाकरमान्यांच्या वाहनांची गर्दी होऊ लागली आहे. मुख्यमंत्र्यांनी पान २ वर

# स्लॅब कोसळून तिघांचा मृत्यू

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबईतील दिंडोशीमधील एका बांधकाम सुरु असलेल्या इमारतीचा स्लॅब कोसळून तीन मजुरांचा मृत्यू झाला आहे. तर, काही मजूर गंभीर जखमी झाले आहेत. मालाड पश्चिम या ठिकाणी असलेल्या गोविंदनगर भागात अनेक इमारतींचे बांधकाम सुरु आहे. यातील बांधकाम सुरु असलेल्या नवजीवन इमारतीचा स्लॅब गुरुवारी दुपारी १२.३० च्या सुमारास कोसळला. या इमारतीच्या २० व्या मजल्याचे काम सुरु होते. दरम्यान, अग्निशमन दल आणि पोलिसांकडून बचावकार्य सुरू आहे.

# सेमीकंडक्टर निर्मितीच्या प्रकल्पाला मान्यता

- **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा**
- **पनवेल येथे उभारणार मोठा प्रकल्प**

**। मुंबई । दिलीप जाधव ।**

रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे टॉवर सेमीकंडक्टर कंपनी व अदानी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प करण्यात येणार आहे

राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पुणे, पनवेल येथे १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित चार विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. ५) मान्यता दिली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. या प्रकल्पांमुळे सुमारे २९ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. पान २ वर

# भुयारी मार्गाने वाजवली धोक्याची घंटा

**मार्ग सुरू होण्यापूर्वीच कंटेनर, दोन बसेसचा अपघात**



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातून गेल्यावर्षी गणेशोत्सवापूर्वी चाकरमान्यांच्या वाहनांची वाहतूक सुरू करण्यात आल्यानंतर यंदा ३ सप्टेंबर रोजी दुसरा भुयारी मार्ग सुरू करण्याचे संकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी दौऱ्यादरम्यान दिले होते. मात्र, दुसरा भुयारी मार्ग वाहतुकीसाठी खुला होण्यापूर्वीच गुरूवारी सकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास पहिल्या भुयारी मार्गामध्ये एका कंटेनरचालकाने अचानक ब्रेक्स दाबल्याने मागून येणारी एसटी बस कंटेनरवर धडकली, तर एसटी बसच्या मागून येणाऱ्या दुसऱ्या एसटी बसने आधीच्या बसला धडक दिल्याने तीनही वाहनांची एकाच वेळी टक्कर होऊन अपघात झाला. परिणामी, कोकणात जाणाऱ्या चाकरमानी जनतेचा खोळंबा झाल्याने दुसरा भुयारी मार्ग सुरू होण्यापूर्वी पहिल्या भुयारी मार्गाने संभाव्य धोक्याची घंटा वाजविल्याची चर्चा सुरू झाली आहे.

यावेळी कशेडी टॅप वाहतूक पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कंटेनर चालक बाबुभाई नरसिंगभाई (५६, रा. अहमदाबाद, गुजरात) हा त्याच्या ताब्यातील कंटेनर (जीए ०५ टी ७४२५) घेऊन गोवा दिशेने जात असताना कशेडी घाटाच्या पर्यायी भुयारी मार्गामध्ये आला असता त्याने अचानक कंटेनरला ब्रेक लावल्याने पाठीमागून येणाऱ्या एसटी बसचा चालक प्रकाश प्रल्हाद विरकर (५४, रा. धनगरनगर, शेगाव, जि. बुलढाणा) हा त्याच्या पान २ वर

# जयदीप आपटेला पोलीस कोठडी

**। सिंधुदुर्ग । वार्ताहर ।**

राजकोट येथील शिवपुतळा कोसळल्याच्या प्रकरणात फरार असलेल्या जयदीप आपटेला ४ सप्टेंबरला अटक करण्यात आली. २६ ऑगस्टला राजकोट किल्ल्यावरचा पुतळा कोसळला तेव्हापासून शिल्पकार जयदीप आपटे फरार होता. त्याला ४ सप्टेंबरला पोलिसांनी अटक केली. कल्याण येथील त्याच्या राहत्या घरी तो पत्नी आणि आईला भेटायला आला होता. त्यावेळी पोलिसांनी त्याला अटक केली. दरम्यान, मुख्य आरोपी जयदीप आपटे आणि तांत्रिक सल्लागार डॉ. चेतन पाटील यांना गुरुवारी मालवण येथील न्यायालयात हजर केले असता १० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# यंदा पावसाचा मुक्काम वाढणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

यंदा भारतात पडणाऱ्या पावसाचा मुक्काम दरवर्षीपेक्षा वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे थंडीचा कडाकाही जोरदार बसणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. सप्टेंबरममध्ये ला निना सक्रिय होण्याची शक्यता आहे. यामुळे पावसाळा ऑक्टोबरपर्यंत वाढू शकतो. यामुळे यंदा कडाक्याच्या थंडीमुळे देशाच्या अनेक भागांमध्ये लोकांना त्रास होऊ शकतो.

यंदा प्रथम कडक उष्मा, त्यानंतर पावसाच कहर यामुळे नागरिक हैराण झाले असताना आता हिवाळ्याबाबतही असाच दावा केला जात आहे. हवामान विभागाच्या मते, ला निना सप्टेंबरमध्ये सक्रिय होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे डिसेंबरच्या मध्यापासून जानेवारीपर्यंत यंदा कडाक्याची थंडी पडू शकते. ला निनामुळे सामान्यतः तापमानात घट होते. त्यामुळे हिवाळ्यातही जास्त पाऊस पडतो. त्यामुळे हिवाळा अधिक लांब आणि तीव्र होतो.




### ऑक्टोबरपर्यंत पाऊस का पडणार?

**यंदा मान्सून वेळेवर दाखल झाला, पण जूनमध्ये कमी पाऊस झाला. जुलै आणि ऑगस्टमध्ये चांगला पाऊस झाला. मध्य पूर्व भागात कमी पाऊस पडत आहे आणि आता जास्त पाऊस पडू शकतो. त्याचे कारण म्हणजे, ऑक्टोबरपर्यंत पाऊस पडण्याची चिन्हे आहेत. पूर्व गुजरात आणि पश्चिम मध्य प्रदेशात कोरड्या विसंगतींचे एक हॉट स्पॉट राहिले आहे. दरम्यान, आतापर्यंत उत्तरेकडील प्रदेश आणि हिमालयाच्या पायथ्याशीही २३ टक्के कमी पाऊस झाला आहे.**

लानिनामध्येपूर्वेकडीलवारेसमुद्राचे पाणी पश्चिमेकडे ढकलत असतात. त्यामुळे समुद्राचा पान २ वर

# पुढील दोन दिवस मुसळधार

**। पुणे । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव काही तासांवर आला असतानाच हवामान विभागाने पावसाबाबत वर्तविलेल्या अंदाजाने गणेशभक्तांच्या आनंदावर पाणी पडण्याची शक्यता आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सातारा जिल्ह्याला ६ ते ८ सप्टेंबरदरम्यान जोरदार पावसाचा यलो अलर्ट हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. गणेशोत्सवाचे पहिले दोन दिवस पावसाचे असणार आहेत. कोकण, गोवा आणि विदर्भात ४ ते १० सप्टेंबर, तर मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रातील भागात ६ ते ८ सप्टेंबरदरम्यान जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

**शारीरिक चाचणी पूर्ण, आता लेखी परीक्षेची प्रतीक्षा**

# रायगडला मिळणार नवे होमगार्ड

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

- **३१३ जागांसाठी चार हजार ९८ अर्ज दाखल**
- **दीड हजार पात्र उमेदवारांची घेतली चाचणी**

रायगड जिल्ह्यातील होमगार्ड भरती प्रक्रिया सुरु झाली आहे. अर्ज केलेल्या उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच पोलिसांच्या मदतीसाठी रायगड जिल्ह्याला नवे होमगार्ड मिळणार आहेत.

जिल्ह्यातील रिक्त असलेल्या होमगार्ड जवानांची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ३१३ जागांसाठी २६ जुलैपासून १६ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. या कालावधीत चार हजार ९८ अर्ज दाखल झाले. त्यात तीन हजार २०८ पुरुष व ८९० महिलांचा समावेश आहे. छाननीनंतर दीड हजार उमेदवारांची प्रत्यक्षात शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये एक हजार १८९ पुरुष व ३१८ महिला उमेदवारांनी सहभाग घेतला.



२९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत धावणे, गोळा फेक आदी चाचणी घेण्यात आली. त्यानंतर उमेदवारांची अंतिम निवड यादी जाहीर केली जाणार आहे. त्यामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

आपत्कालीन कालावधीत तसेच वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून होमगार्ड जवान काम करतात. जिल्ह्यात होणाऱ्या होमगार्डच्या भरतीनंतर रायगड जिल्ह्याला ३१३ नवे होमगार्ड मिळणार आहे. या होमगार्डच्या मदतीने जिल्ह्यातील आगामी सण, उत्सव तसेच मोर्चे, आंदोलने अशा ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची मदत होण्याची शक्यता आहे.

**होमगार्डवर दृष्टीक्षेप**

| | |
|---|---|
| लक्षांक | 900 |
| पटावर असलेले | 551 |
| भरती होणारे | 313 |

### निवड यादी दोन दिवसांत लागणार

**रायगड जिल्ह्यात होमगार्ड भरतीसाठी मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाले आहेत. शारीरिक चाचणीदेखील झाली आहे. दोन दिवसांनंतर अंतिम निवड यादी जाहीर केली जाईल. होमगार्डचे प्रशिक्षण ३५ दिवसांचे असून, त्यानंतर त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी मागणीनुसार नियुक्त केले जाणार असल्याची माहिती होमगार्ड कार्यालयाकडून देण्यात आली आहे.**




# लाडक्या बहिणींची बँकांमध्ये गर्दी

## वादाच्या घटनांमध्ये वाढ, कर्मचाऱ्यांची दमछाक

**। मुरूड शहर । वार्ताहर ।**

शासनाच्या लाडकी बहीण योजनेंतर्गत बँकांच्या खात्यामार्फत दीड हजार रुपये प्रतिमहिना महिलांना दिले जात असल्याने ते काढण्यासाठी सर्वत्र बँकांमध्ये महिलांची दररोज प्रचंड गर्दी होत आहे. या कामाची पूर्तता करण्यासाठी सरसावलेल्या कर्मचाऱ्यांनादेखील तोंड देताना नाकी नऊ येत आहेत. यामुळे बँकेत कामाचा प्रचंड ताण वाढल्याने कर्मचाऱ्यांची पुरती दमछाक होताना दिसून येत आहे. कर्मचाऱ्यांना घरी जाण्यासाठी रोज रात्री नऊ वाजत असल्याची माहिती मिळाली.



खंडित होणारा वीजपुरवठा, नेटवर्क बंद पडणे, नेटवर्क स्लो होणे यामुळेदेखील यात भर पडत असून, ग्रामीण भागात याची अधिक झळ बसत आहे. बँकांतून मोठी गर्दी होत असून, बसायलाही जागा अपुरी पडत असल्याने महिलांचेदेखील उभे राहून पाय दुखत आहेत. अशा विचित्र परिस्थितीमुळे मुदत ठेवी ठेवणारे बँक ग्राहकदेखील आपले बँकिंग काम करण्यासाठी बँकेत येण्यास नाखूष दिसून येत आहेत. मुरूडमध्ये ग्राहकांच्या दुचाकी पार्क करण्यासाठी पार्किंग नसल्याने अनेकांना पोलिसांचा दंडदेखील भरावा लागत आहे.

अनेक महिलांची बँक खाती काहींना काही कारणाने बंद असल्याने सुरू करण्यासाठी कागदपत्रे सादर करावी लागत असल्याने त्रास अधिक होत आहे. मात्र, नियमानुसार केवायसी आवश्यक असल्याने कागदपत्रे दिल्यानंतर खाते सुरू केले जात आहे. आधार कार्डदेखील लिंक नसल्यास पुन्हा अडचणी येत आहते. या सर्वांची पूर्तता करताना सामान्य खातेदारदेखील हैराण होताना दिसून येत आहेत.

आपल्या शेजारी राहणाऱ्या महिलेला पैसे मिळाले, मला का नाही? या आणि अशा अन्य प्रश्नांवर बँकेत प्रकरणे हमरीतुमरीवर येत असून, महिलांना समजविताना कर्मचारीदेखील हैराण झाले आहेत. या योजनेचे पैसे घेण्यासाठी महिला भगिनी सकाळपासूनच बँकेपाशी हजर होत आहेत. काही बहिणींच्या खात्यात पैसे आले, मात्र खाते बंद असल्याने किंवा खात्यात कमीत कमी बॅलन्स नसल्याने सर्विस चार्जेस कापले जात असल्याने खात्यात आलेली रक्कम शिल्लक राहात नाही. त्यामुळे ग्राहक आणि कर्मचारी यांच्यात वादाची ठिणगी पडताना दिसत आहे. या योजनेची अंमलबजावणी करताना कामाचा ताण प्रचंड वाढल्याने इतर ग्राहकांच्या डिपॉझिट, कर्ज, नेफ्ट, आर्टिजस आणि आवश्यक महत्त्वाच्या बँकिंग सेवेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# श्रीवर्धनमध्ये बिबट्याची दहशत

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील गावो गावी काही दिवसाआड बिबट्याचे दहशत वाढू लागली आहे. पहिल्यांदा सर्वा त्यानंतर दांडगुरी आणि आता कोंढेपंचतन परिसरात रात्रीच्यावेळी गावालगत बिबट्याचे दर्शन झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. सणासुदीला हा प्रसंग ओढवल्याने स्थानिकांमध्ये घबराट पसरली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील दांडगुरी गाव सोडल्यानंतर तीन दिवसापूर्वी सोमवारी रात्रीच्यावेळी श्रीवर्धन-बोर्ली पंचतन मुख्य रस्त्याला बिबट्याचे दर्शन झाल्याने एकच खळबळ उडाली होती. या मागील दिवसात याच मार्गावर रस्त्याला वावरत असताना हा बिबट्या अचानक येणाऱ्या वाहनांच्या आवाजाने दांडगुरी परिसरातील असलेल्या झाडा झुडपांमध्ये लपून बसतो व पुन्हा रात्री बेरात्री बाहेर



येतो. असं येथील ये-जा करणाऱ्या प्रवाशांचे म्हणणे आहे. एकतर बिबट्याचे नावाने अनेकांचा थरकाप उडतो. आता सदर बिबट्याने आपला मोर्चा रहिवासी परिसरात वळविल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

सध्या वाघ जंगल सोडून मानववस्तीत आल्याने नागरिकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सणासुदीच्या दिवसांत बिबट्याच्या दहशतीमुळे जंगल परिसरातील लोकांचे जगणे मुश्किल होऊन बसले आहे. शेतीची हंगामी कामे करणे, किंवा मिळेल ते काम करून आपला प्रपंच चालविणे, ही या लोकांची कामे आता बिबट्याच्या भीतीमुळे खोळंबली जाणार आहेत. त्यामुळे वनविभागाकडून जोपर्यंत बिबट्याचा बंदोबस्त लावला जात नाही, तोपर्यंत गावकऱ्यांमधील भीतीचे वातावरण दूर होणार नाही, हेही तितखेच खरे आहे.

> **तालुक्यातील जंगल परिसरात बिबट्याचे मोठ्या अंतरात भ्रमंती होते, तो बिबट्याचा अधिवास आहे. त्यामुळे तो अनेकांना अधून मधून दिसत असतो. यामुळे आम्ही ग्रामस्थांना काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसे गावांना सतर्कतेसाठी भेटी देत आहोत.**
>
> **- संजय पांढरकामे, वनपरिक्षेत्रपाल, श्रीवर्धन**

# गणेशोत्सवाची लगबग अंतिम टप्प्यात

## बाजारपेठ सजली, चित्रशाळेत मूर्ती कारागीर दंग

**। उरण । वार्ताहर ।**

गणेशोत्सवाला एक ते दोन दिवसांचा अवधी उरला असतानाच उरण तालुक्यातील अनेक कलाकारांच्या गणपती कारखान्यात हर तऱ्हेच्या गणेशमूर्तींवर रंगकामांचा शेवटचा हात फिरवण्यात मूर्ती कारागीर दंग झाल्याचे दिसून येत आहे. विविध प्रकारच्या प्लास्टिकच्या फुल, हार, झाडा, वेलीबरोबर रंगीबेरंगी विद्युत साहित्याची तसेच अगरबत्तीसह पूजेसाठी लागणाऱ्या सामान, साहित्यांनी बाजारपेठ सजल्या आहे. तसेच ढोलकी विक्रेत्यांची गावागावात रेलचेल सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



उरण तालुक्यात दोनशे लहान-मोठे कारखाने आहेत. त्यातील एकट्या चिरनेर गावात ३५ कारखाने आहेत. दरवर्षी मे ते जून महिन्यात सर्व कारखान्यात गणेशमूर्ती घडविण्याच्या कामाला सुरुवात होत असते. यावर्षीही वाढत्या वीज समस्येचा सामना हा मूर्ती कारागिरांना सहन करावा लागला आहे. दरम्यान, वाढत्या शाडू मातीच्या व रंगांच्या किमतीमुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत मूर्तींच्या किमतीत वाढ होणार असल्याचे मत चिरनेर चित्र शाळेतील मूर्तीकार जागृती राम चौलकर यांनी सांगितले.

# चक्रधर स्वामींना जयंतीनिमित्त अभिवादन

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर पोलीस ठाण्यात भगवान सर्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाकडील प्राप्त परिपत्रकान्वये आदेशीत केल्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाणे येथे उपस्थित सर्व अधिकारी, अंमलदार, पोलीस पाटील यांच्यावतीने भगवान चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.

# तालुक्यातील १६७ शिक्षकांचा सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत आणि खालापूर तालुक्यातील १६७ शिक्षकांचा सन्मान शिक्षकदिनी आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी आपल्या माणसाने केलेला सत्कार राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार यांच्यापेक्षा मोठा असल्याचा दावा केला.




कर्जत विधानसभा मतदारसंघ आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून कर्जत आणि खालापूर तालुक्यातील शिक्षकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर पोसरी येथे असलेल्या शिवतीर्थ सभागृह येथे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान घरत यांनी प्रास्ताविक तर शिक्षक वर्गाचे वतीने प्रवीण म्हसे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात जिल्हा शिक्षक पुरस्कार मिळविणारे भगवान घरत कर्जत आणि राजेंद्र फुलावरे खालापूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.तसेच झाडाखाली शाळा चालविणाऱ्या इशिका शेलार यांच्यासह कर्जत आणि खालापूर तालुक्यातील तब्बल १६७ शिक्षकांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

## महापालिका मुख्यालयात अभिवादन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी (दि. ५) सप्टेंबर रोजी भगवान सर्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रारंभी आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, उपस्थित अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी चक्रधर स्वामींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले.

पान १ वरून

## गणेशभक्त ‘टोलमुक्त’

सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दि.१४ ऑगस्ट रोजी झालेल्या गणेशोत्सव पूर्वतयारी आढावा बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते, त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने टोलमाफीचा शासन निर्णय जारी केला आहे. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना ही टोल माफी लागू असणार आहे. गणेशोत्सवासाठी ज्या जिल्ह्यातून बसेस येथील त्या ठिकाणच्या पोलीस किंवा आरटीओ यांच्याकडून हे पास एसटी महामंडळाला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना देण्याच्यादेखील सूचना आहेत.

## गणेशोत्सवात सुरक्षेसाठी उपाययोजना करणार

गटाला अपमानित करणारे वाक्य असल्याने त्यातूनही अशांतता निर्माण होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी दोन-चार मार्ग एकत्र आलेले असतात. त्याच मार्गावर शुभेच्छांचा भला मोठा फलक लावला जातो. त्यामुळे चालकांचे लक्ष वेधून अपघात होण्याची भीती आहे. त्यामुळे फलक काढले पाहिजे. मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पेपासून महाडपर्यंत प्रशासनाकडून सुविधा केंद्र निर्माण केली आहेत. परंतु, जलवाहतुकीद्वारे मुंबईकडून अलिबागकडे येणाऱ्या प्रवाशांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहे. अलिबागमधून मुरूड, श्रीवर्धनकडे जाणारे प्रवासी अधिक आहेत. या सर्व प्रवाशांचा ताण अलिबाग एसटी स्थानकावर येतो. स्थानकात काही सुविधा प्राप्त होत नाही. त्यामुळे महामार्गाप्रमाणे अलिबागमध्ये शहरातील बस स्थानकात सुविधा केंद्र उभारण्यात यावेत, अशी सूचना ॲड. म्हात्रे यांनी केली होती. त्याची दखल घेत अलिबाग बसस्थानकात हिरकणी कक्ष, ज्येष्ठ नागरिक प्रतीक्षा कक्ष, वैद्यकीय सुविधा कक्ष सोयी-सुविधांसह केंद्र उभारण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात २९२ गणेशोत्सव मंडळे आहेत. या मंडळांमार्फत सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. कार्यक्रम पाहण्यासाठी महिला, मुली, तरुणींची रात्रीच्या वेळी रस्त्यावरून वर्दळ असते. त्यामुळे महिलांचे मंगळसूत्र खेचून नेणे, तसेच अत्याचार होण्याची भीती आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना म्हणून महिला पोलीस पथके तालुका स्तरावर तयार करून त्या माध्यमातून गस्त वाढविणे, अशा अनेक सूचना ॲड. मानसी म्हात्रे यांनी प्रशासनाकडे केल्या. त्यांच्या मागणीची दखल घेत अलिबाग स्थानकात सुविधा केंद्र सुरु करण्यात आले असून, अन्यदेखील सूचनांची दखल प्रशासनाकडून घेण्यात आली आहे.

## यंदाही प्रवास खड्ड्यांतूनच

पाहणी केल्यानंतरदेखील महामार्गाची दुरवस्था कायम असल्याने यावर्षीदेखील खड्ड्यातूनच चाकरमान्यांना प्रवास करावा लागणार आहे. शिवाय, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू असल्याने एकेरी मार्गाने वाहतूक सुरू असल्याने वाहतूक कोंडीचादेखील फटका बसत आहे. यावर्षी ७ सप्टेंबर रोजी गणरायाचे आगमन होत असल्याने ४ सप्टेंबरपासूनच गणेशभक्तांची कोकणात जाण्यास सुरुवात झाली. अनेक जण रेल्वे प्रवास पत्करत असले, तरी ज्यांना रेल्वेने शक्य होत नाही, ते आपल्या वाहनांनी प्रवास करतात. ज्या महामार्गावरून हे चाकरमानी प्रवास करतात, त्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचा चौपदरीचा पहिला टप्प्याचे काम अद्याप बाकी आहे. तर, दुसरा टप्पा महाड तालुक्यापासून कोकण तळापर्यंत ९० टक्के पूर्ण झालेला आहे. बहुतांश कामे झाल्याचे मंत्र्यांच्या दौऱ्यातून भासवले जात असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांची संख्या यावर्षी अधिक आहे. महामार्गावर तीन ठिकाणी वाहतूक कोंडी कायम होत आहे. माणगाव, लोणेरे आणि टेमपाले या तीन ठिकाणी फार मोठ्या अडचणी निर्माण होऊन वाहतूक कोंडी होत आहे. तासन्‌तास वाहनांच्या रांगा लागत असल्याने गणेशभक्तांना महामार्गावर वाहनांतून बसून राहावे लागत आहे. माणगावमध्ये अरुंद रस्त्यावर लागलेली दुकाने आणि रस्त्यालगत बेजबादारपणे उभी करण्यात येणारी वाहने तसेच लोणेरे आणि टेमपाले या ठिकाणी सुरू असलेल्या पुलांची कामे आणि महामार्गावर पडलेले खड्डे हे कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना अडचणीचे ठरले आहेत.

एसटीने प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांनादेखील या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच ज्या गाड्या सीएनजीवर अवलंबून आहेत, त्यांनादेखील सीएनजी भरण्यासाठी ताटकळत उभे राहावे लागत आहे. एसटीमध्ये सीएनजी भरण्यासाठी पेणनंतर महाड या ठिकाणी बसेस थांबवाव्या लागत आहेत. सीएनजी भरताना प्रवाशांना खाली उतरावे लागते, त्यामुळे महाड आगारात असलेल्या सीएनजीवर प्रवाशांना बसण्यासाठी कोणतीच सुविधा नाही तसेच स्वच्छतागृह सुविधादेखील नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. हीच अवस्था खासगी सीएनजी पंपांवरदेखील दिसून येत आहे.

## यंदा पावसाचा मुक्काम वाढणार

पृष्ठभाग हा थंड होतो. हवामान विभागाचा अंदाज आहे की, सप्टेंबर ते नोव्हेंबरदरम्यान ला निना सक्रिय होण्याची शक्यता ६६ टक्के आहे. तर हिवाळ्यात त्याच्या टिकून राहण्याची शक्यता ७५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ला निना परिस्थितीमुळे पावसाळा लांबण्याची शक्यता आहे. यंदा भारतात १५ ऑक्टोबरला मान्सून संपणार आहे. ऑक्टोबरच्या शेवटी दक्षिण भारतात येणाऱ्या ईशान्य मान्सूनवरही याचा परिणाम होऊ शकतो.

## शेतकऱ्यांसाठी लढणार

त्याबाबत गेल कंपनी प्रशासनाशी वाटाघाटीही सुरू केल्या आहेत. तालुक्यातील रावे, कोपर, डावरे, हनुमान पाडा, जोहे, कळवे, कणे, बोर्झे, ओढांगी, वाशी, बोरी, वडखळ, शिर्की, बोर्वे, मसद आदी गावांतील शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी गेल कंपनी गॅस पाईपलाईनसाठी भूसंपादन करत असल्याने येथील हजारो शेतकरी उद्ध्वस्त होणार आहेत. त्यामुळे सदर कंपनीविरोधात २४ गाव सेझ संघर्ष समितीच्या माध्यमातून शेतकरी आक्रमक झाले असून, त्यांनी प्रांत कार्यालय येथे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करून शासनाला इशारा दिला आहे. उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, गेल कंपनीने गॅस पाईपलाईनसाठी येथील जमिनी भूसंपादन करण्याचा घाट घातला आहे. यामुळे येथील शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त होणार आहे. याला वारंवार शेतकऱ्यांनी विरोध केला असून, अनेकदा आंदोलनेही केली आहेत. त्यातच १२ फ ेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दोन्ही बाजूनी ठरून भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करावी, अशी मागणी केली असता त्यावेळी कंपनीने कबूल केले होते. मात्र, आता याकडे शासन व कंपनी प्रशासन कानाडोळा करत असल्याने अखेर शेतकऱ्यांनी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले. या आंदोलनाला दिलीप पाटील, काशिनाथ पाटील, आर.के. पाटील, संजय थळे, लवेंद्र मोकल, विनोद म्हात्रे, राष्ट्रीय कबड्डीपटू मारूती म्हात्रे आदी उपस्थित होते.

## सेमीकंडक्टर निर्मितीच्या प्रकल्पाला मान्यता

या प्रकल्पांमुळे राज्यात सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहन निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहननिर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होण्यास मदत होणार आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल. स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांची रोजगारक्षमता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील कौशल्य वाढण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

टॉवर सेमीकंडक्टर कंपनीचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प पनवेल, जि. रायगड येथे करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात ५८ हजार ७६३ कोटी, तर दुसऱ्या टप्प्यात रूपये २५ हजार १८४ कोटी अशी एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पामुळे १५ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे.३० जुलै २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स यांच्या सेमीकंडक्टर निर्मितीच्या अतिविशाल प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प सेमीकंडक्टर निर्मितीचा राज्यातील पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये लवकरच ओसॅट, चिप्स निर्मिती सुरू होणार आहे. आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स व टॉवर सेमीकंडक्टर कंपनी यांच्या प्रकल्पांमुळे प्रगत सेमीकंडक्टरची निर्मिती होणार आहे.

## भुयारी मार्गाने वाजवली धोक्याची घंटा

ताब्यातील एसटी बस (एमएच १४ बीटी ४३५५) मुंबई ते मालवण असा २५ प्रवासी घेऊन जात असताना व दुसरा बस चालक संतोष हरमकर (४१, रा. शहापूर ठाणे) हा आपल्या ताब्यातील एसटी बस (एमएच २० सीजी ४५६३) ठाणे ते खेड ४५ प्रवासी घेऊन जात असताना कशेडी बोगद्यात कंटेनर चालकाने ब्रेक लावल्याने तीनही वाहने एकमेकांवर आदळून तिहेरी अपघात झाला. या अपघातात कोणालाही दुखापत झाली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.कशेडी घाटातील भुयारी मार्गातील या अपघातानंतर तब्बल एक तास अन्य वाहनांतील प्रवाशांना भुयारी मार्गात उतरून वाहतूक सुरळीत होईपर्यंत अपघातग्रस्त वाहने व भुयारी मार्ग दर्शनाने टाईमपास करावा लागला. पोलिसांनी तातडीने याठिकाणी येऊन वाहतूक सुरळीत केल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होऊनही वाहने कोकणाकडे मार्गस्थ होण्यास मदत झाली. ३ सप्टेंबर रोजी दुसऱ्या भुयारी मार्गातून गणेशोत्सवापुरती वाहतूक सुरू करण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी संकेत दिले असताना दुसऱ्या भुयारी मार्गातील पुष्कळसे काम अपूर्ण असल्याने ते युध्दपातळीवर पूर्ण करण्यास सुरूवात करण्यात आली. मात्र, तरीदेखील निर्धारित ३ सप्टेंबरची तारीख उलटूनही भुयारी मार्ग सुरू करण्यात आला नसताना पहिल्या भुयारी मार्गातील या अपघाताने समोरासमोरून वाहतूक सुरू असताना झालेल्या अपघातावेळी वाहतुकीची कोंडी भुयारी मार्गात किती कमी वेळात होऊ शकते, याची चुणूक दाखविल्याने दुसऱ्या भुयारी मार्गातून तातडीने वाहतूक सुरू करण्याची अपरिहार्यता निर्माण झाली आहे.

# सिडकोकडून मेट्रोच्या भाड्यामध्ये कपात

## उद्यापासून तिकिटाचा किमान दर १०, तर कमाल ३० रुपये

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळातर्फे बेलापूर ते पेंधर या नवी मुंबई मेट्रो मार्गावरील मेट्रोच्या तिकिटांमध्ये ३३ टक्क्यांपर्यंत लक्षणीय कपात करण्यात आली असून, दि. ०७ सप्टेंबरपासून नवी मुंबई मेट्रो सेवेकरिता सुधारित तिकीट दर लागू होणार आहेत. सुधारित दरांनुसार तिकिटाचा किमान दर रु. १० व कमाल रु. ३० असणार आहे.

जलद आणि आरामदायी प्रवासाचा पर्याय असणाऱ्या मेट्रोचा लाभ अधिकाधिक प्रवाशांना घेता यावा याकरिता तिकीट दरांमध्ये कपात करण्यात आली आहे. सुधारित तिकीट दरांमुळे जवळच्या तसेच लांबच्या अंतरावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही फायदा होणार आहे. यापुढेही नवी मुंबईकरांनी मेट्रो सेवेला असाच उत्तम प्रतिसाद देऊन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले आहे. सुधारित दरांनुसार पहिल्या ० ते २ कि.मी. आणि २ ते ४ कि.मी.करिता रु. १०, पुढील ४ ते ६ कि.मी. आणि ६ ते ८ कि.मी.करिता रु. २० आणि ८ ते १० कि.मी.च्या टप्प्यासह त्यापुढील अंतराकरिता रु. ३० असे तिकीट दर लागू होणार आहेत. यापूर्वी, बेलापूर टर्मिनल ते पेंधर टप्प्याकरिता तिकिटाचा दर रु. ४० इतका होता. हा तिकीट दर आता रु. ३० असणार आहे. सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर विकसित करण्यात आला आहे. या मार्गामुळे सीबीडी, तळोजा एमआयडीसी आणि सिडकोच्या खारघर येथील गृहसंकुलांना उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.

दिनांक : ०६ सप्टेंबर २०२४

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| एकनाथ मनोहर रसाळ | ६१ | २ | २-००-० | १-३८ |
| | यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-६०-० यापैकी विक्री केलेले क्षेत्र ०-४०-० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-०६/०९/२०२४

**पनवेल महानगरपालिका**
**अग्निशमन विभाग**
**अंदाजीत दरपत्रक मागणी सुचना**

याद्वारे सर्व व्यवसायीक/कंत्राटदार... इ. यांना सुचित करण्यात येते कि, पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता आवश्यक साधनसामुग्री खरेदी करणे आवश्यक आहे.

याकामी सर्व ईच्छुकांनी सदर साहित्यांची यादी अग्निशमन विभागाकडुन प्राप्त करुन आपले दर बंद लिफाप्यात दि. १०/०९/२०२४ रोजी पर्यंत अग्निशमन विभागात सादर करावेत.

सही/-
**(कैलास गावडे)**
उपआयुक्त (मुख्यालय-I)
पनवेल महानगरपालिका

जा.क्र./पमपा/अग्नि/२६२१/प्र.क्र.१६/२९४९/२०२४
दिनांक :-०५/०९/२०२४
ठिकाण :- पनवेल महानगरपालिका, पनवेल.

**अलिबाग नगरपरिषद**
**जाहिर निविदा सुचना**

याद्वारे मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद यांच्याकडून खालील मोकाट गुरांना पकडणे व कोंडवाड्यात टाकणेकामी इच्छुक निविदा धारकांकडून जाहिर निविदाद्वारे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव व प्रकार | कामाचा कालावधी | इसारा रक्कम | फॉर्म फी | निविदा फॉर्म मिळण्याची तारीख | सिलबंद निविदा सादर करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगरपालिका हद्दीतील मोकाट गुरांना पकडून कोंडवाड्यात टाकणे व त्यांची देखभाल करणे | १ वर्ष | २०००/- | १००/- | ०६/०९/२०२४ ते १९/०९/२०२४ वेळ सकाळी ११.०० ते ४.०० पर्यंत | ०६/०९/२०२४ ते १९/०९/२०२४ |

सूचना. : १) कामाबाबत अधिक माहिती नगरपालिका कार्यालयात आरोग्य विभागात उपलब्ध होईल.
२) निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याच्या असून लिफाफा नं. १ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं. २ मध्ये वित्तीय बोलीचा फॉर्म सादर करण्याच्या आहे.
३) राष्ट्रीयकृत बँकांकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी.
४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
अलिबाग नगरपरिषद

**जाहीर नोटीस**

सर्वांना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गाव कोळगांव येथील, खालील वर्णनाची मिळकत माधवी चंद्रकांत करडेले, सुशांत चंद्रकांत करडेले, अमित चंद्रकांत करडेले आणि अमोद चंद्रकांत करडेले यांचे खुद्द मालकीची आहे.

| गट सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रूपये-पैसे) |
|---|---|---|
| १२९/२ | २-१६-८० ०-११-६० | ५८-३१ |
| | २-२८-४० | |

आमचे अशिलांनी वर नमूद मिळकतीपैकी २० आर म्हणजेच २००० चौरस मीटर क्षेत्र विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर खरेदी व्यवहार करणेपूर्वी वर नमूद सर्व्हे/गट नंबर १२९/२ या मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, सर्व्हे/गट नंबर १२९/२ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचा दान, गहाण, साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशील करणार असलेल्या प्रस्तावित व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०५/०९/२०२४

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९





# जलजीवनमध्ये सावळागोंधळ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागामार्फत जलजीवन मिशन अंतर्गत गावागावात कामे केली जात आहेत. परंतु, या कामांमधील सावळागोंधळ दिवीपारंगीमधील सामाजिक कार्यकर्ते जयवंत ठाकूर यांनी उघडकीस आणला आहे. योजनेचे काम झाले नसताना लाखो रुपयांचे बिल काढून ते गिळंकृत करण्याचा प्रकार समोर आणला आहे. त्यांच्या तक्रारीनंतर प्रशासन खडबडून जागे झाले. यानंतर कामाला पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे.**

### ■ अपूर्ण कामाचे काढले पूर्ण बिल

अलिबाग तालुक्यातील चिंचोटी ग्रामपंचायत हद्दीतील दिवीपारंगी गावातील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा व्हावा, यासाठी जलजीवन मिशन योजनेंतर्गत जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागामार्फत काम मंजूर करण्यात आले होते. तसेच, या योजनेचे काम एका एजन्सीला देण्यात आले होते. मात्र, नऊ महिन्यांपूर्वी २२ नोव्हेंबर २०२३ रोजी काम पूर्ण झाल्याची नोंद जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागात करून झाद एंटरप्रायझेस कंपनीच्या नावाने ३० लाख रुपयांचे कामाचे पूर्ण बिल काढण्यात आले असल्याचे







ठाकूर यांनी उघड केले आहे. सद्य:स्थितीत गावातील जलजीवनचे काम अपूर्णच आहे. जलजीवनचे काम पूर्ण झाले नसल्याचा आरोप जयंवत ठाकूर यांनी केला आहे. ही बाब त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले आणि ठेकेदाराला काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या या कारभाराबाबत जनतेमध्ये मोठा आक्रोश निर्माण झाला आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागाचा सावळागोंधळ उघड झाल्यामुळे जिल्ह्यात अशाच प्रकारची कामे न करता बिले काढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अपूर्ण काम पुन्हा सुरु करण्यात आले आहे. मात्र, त्या कामातदेखील भ्रष्टाचार होत असल्याचे उघड झाले आहे. पाईपलाईन टाकण्यासाठीचे खड्डे वरच्या वरच खोदला जात असल्यामुळे कुंपणच शेत खात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### अधिकाऱ्यांनी बोलणे टाळले

**याबाबत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांच्याशी संपर्क साधला असता, उपअभियंता यांच्याशी संपर्क करा असे सांगून त्यांनी या विषयावर बोलणे टाळले.**

> **“दिवीपारंगीमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत योजनेचे काम जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत केले जात आहे. ग्रामपंचायतीला याबाबत कोणतीही माहिती नाही. दिवीपारंगी येथील अपूर्ण कामाबाबत तक्रार दाखल केली होती. सध्या कामाला सुरुवात झाली आहे.**
> **– प्रदिप दिवकर, ग्रामविकास अधिकारी, चिंचोटी”**

## जिल्ह्यातील चार पोलीस कर्मचाऱ्यांची बढती





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
रायगड पोलीस दलातील चार पोलीस कर्मचाऱ्यांची बढती करण्यात आली आहे. त्यात दोन हवालदारांना सहाय्यक फौजदार व दोन पोलीस कर्मचाऱ्यांना हवालदार म्हणून पदोन्नती मिळाली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते गुरुवारी (दि.५) बढती पदक बहाल करण्यात आले.

रायगड पोलीस दलातील पोलीस हवालदार दिनेश रामनाथ पिंपळे हे श्रीवर्धन तालुक्यातील कुडगांव येथील आहेत. १९९५ मध्ये ते रायगड पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून रूजू झाले. सुरुवातीला पोलीस मुख्यालय, मुरूड, अलिबाग, पेण, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा येथे त्यांनी सेवा केली असून सध्या रेवदंडा पोलीस ठाण्यात ते कार्यरत आहेत. पोलीस खात्यात त्यांनी आतापर्यंत तीस वर्षे सेवा केली आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातील पोलीस हवालदार इकबाल अत्तार यांचीदेखील सहाय्यक फौजदार म्हणून बढती करण्यात आली आहे. रायगड अंगुली मुद्रा कक्षातील पोलीस नाईक उमेश शिंदे, बोरघाट येथील वाहतूक महामार्ग केंद्रातील पोलीस नाईक अशिष ठाकूर यांची पोलीस खात्यामध्ये दहा वर्षाहून अधिक सेवा झाली आहे. त्यांना पोलीस नाईक या पदावरून पोलीस हवालदार म्हणून बढती मिळाली आहे.



शिक्षक दिनानिमित्त गुरूवारी (दि.५) मा. नगरसेवक प्रमोद भगत यांनी कामोठे सेक्टर ९ येथील मा. आमदार दत्तूशेठ पाटील विद्यालयात उपस्थित असलेल्या शिक्षकांची भेट घेऊन त्यांना गुलाबाचे फूल देत शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याबद्दल शाळेच्यावतीने प्रमोद भगत यांचे आभार मानण्यात आले.

### शिक्षकांचा सन्मान

**। उरण । प्रतिनिधी ।**
तालुक्यातील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी यांच्यावतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी आपली शिक्षका प्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## संकटकालीन बचाव प्रशिक्षण संपन्न

**। पेण । प्रतिनिधी ।**
पेण एसटी आगरात दोन गटांमध्ये तुंबल मारामारी झाली. याची माहिती मिळताच उपविभागीय अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पोलीस निरिक्षक संदीप बागुल यांनी पोलीस तुकडीला आदेश दिले. तात्काल पोलीस तुकडीने घटनास्थळी जाऊन दंगल खोरांना ताब्यात घेऊन पोलीस गाडीत बसवून पोलीस ठाण्यात रवाना केले. काही काळ पेण बस स्थानकात असणाऱ्या प्रवाशांना काय प्रकार चालला आहे हे समजत नव्हते. एकंदरीत बस स्थानकात तणावाचा आणि चर्चेच वातावरण तयार झाले होते. परंतु, खुप वेळानंतर हे मॉक



ड्रिल असल्याचे प्रवशांच्या लक्षात आले.

पेण पोलीस ठाण्यामार्फत पेण एसटी आगरात संकटकालीन बचाव प्रशिक्षण घेण्यात आले होते. आणीबाणीच्या वेळी किंवा आपातकालीन स्थितीत बऱ्याच वेळेला प्रशासनाची तारांबळ उडत असते. ही तारांबळ उडू नये म्हणून दंगल जन्य परिस्थिती कशी हाताळता येईल याचे प्रात्यक्षित करण्यात आले होते. यामध्ये पेण पोलीस ठाण्याचे कर्मचारी, अधिकारी तसेच विक्रम मिनीडोअर व रिक्षा चालकांनी सहभाग घेतला होता.

## गणेशमूर्तीवर अखेरचा हात

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**
अवघ्या काही तासांवर येऊन ठेपलेल्या गणरायाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्तीचे रंगकाम अंतिम टप्यात आले आहे. यावेळी शहरासह ग्रामीण भागातही मूर्तिकार रंगकामासाठी दिवस-रात्र मग्न असलेले पहायला मिळत आहे. मूर्तिकार, रंगकाम करणारे कारागीर गणेशमूर्तीवर शेवटचा हात फिरवत आहेत. त्याचबरोबर ठिकठिकाणी मूर्ती विक्रीला ठेवण्यात आल्या असून बुकिंग ही मोठ्याप्रमाणावर होत आहे. गणेश मूर्तीवर अखेरचा हात फिरवत असताना मूर्तीचा जीव असणारे डोळे, किरीट, त्रिशूल, गंडक आदीचे रंगकाम अंतिम टप्प्यात आले आहे. यामध्ये मूर्ती आकर्षक व रेखीव दिसण्यासाठी डोक्याच्या किरीटाला सोनेरी, सिंहासनाला फिकट गुलाबी, पाठीमागील आसनाला लाल, हिरवा, पिवळा, केशरी आदी रंगानी पुरवठा केला जात आहे. गणेशमूर्ती आकर्षक होण्यासाठी पर्ल कलर व चकमक यांची नवीन डिझाईन आखण्यात येत आहे. यामुळे ग्राहकांचा या डिझाईनच्या गणेशमूर्ती खरेदी करणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे.

### ऱ्हितिका जन्नावार हिचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार

## अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**अलिबागच्या ऱ्हितिका प्रशांत जन्नावार हिचा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विधी शाखेत पदवीत्तर पदवी उतीर्ण करणाऱ्या रितिकाला नानी पालखीवाला ट्रस्टच्यावतीने दिल्या जाणाऱ्या सुवर्ण पदकाने तिला गौरविण्यात आले.**



सिंबॉयसिस इंटरनॅशनल विद्यापिठाचा २१ वा दिक्षांत समारोह नुकताच पुणे येथे पार पडला. यावेळी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू, राज्यपाल सि.पी. राधाकृष्णन, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. यावेळी विद्यापिठातून उल्लेखनीय कामगिरी करत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. यात अलिबागच्या ऱ्हितिकाचा समावेश होता.

ऱ्हितिका ही अलिबागमधील नावाजलेले डॉ. प्रशांत जन्नावार यांची कन्या आहे. तिने फॅमेली लॉ या विषयात एल.एल.एम. पदवी प्राप्त केली आहे. सर्वाधिक गुण मिळवत ती विद्यापिठात पहिली आली आहे. तिच्या या कागगिरीचे अलिबागमधून कौतुक होत आहे.



# नवा बंगाली कायदा

बंगालमध्ये बलात्काराच्या आरोपींना प्रसंगी फाशी देणारा कडक कायदा करण्यात आला आहे. विधानसभेने पारित केलेले याबाबतचे विधेयक आता राष्ट्रपतींकडे संमतीसाठी जाईल. तेथे त्यावर किती दिवस काढले जातात व काय विचार होतो हे पाहावे लागेल. कारण, भाजपच्या विरोधी राज्यातील विधेयके राज्यपाल व राष्ट्रपतींकडे लटकवून ठेवणे ही मोदी राजवटीतील खासियत बनली आहे. बंगालमधील कायदा एका संवेदनशील विषयाबाबत आहे. भाजपवाले गेले वीस दिवस बलात्काराच्या विषयावरून राज्यात आंदोलन करीत आहेत. मात्र विधिमंडळात त्यांनाही ममता बॅनर्जींच्या विधेयकाला पाठिंबा द्यावा लागला. आता देशाच्या महिला राष्ट्रपती त्यावर काय भूमिका घेतात हे पाहणे औत्सुक्याचे असेल. बलात्काराच्या गुन्ह्यांबाबत समाजात प्रचंड चीड आहे. यातील पीडित महिलेला प्रचंड मानसिक छळ सहन करावा लागतो. त्यामुळे असा गुन्हा करणाऱ्याला फाशी दिली पाहिजे ही जुनी मागणी आहे. मुंबईत शक्ती मिलच्या परिसरात एका पत्रकार महिलेवर अत्याचार झाले. त्यानंतर अशीच मागणी झाली व उद्धव ठाकरे यांच्या सरकारने बलात्काराला फाशी व काही गुन्ह्यांमध्ये जन्मठेप देणारे विधेयक २०२० च्या डिसेंबरमध्ये संमत केले. त्यापूर्वी हैदराबादमध्ये एका पशुवैद्यकीय डॉक्टरचा बलात्कार करून निर्घृण खून करण्यात आला होता. त्याविरुध्द निर्माण झालेला प्रचंड संताप ध्यानात घेऊन आंध्र प्रदेशातील जगन रेड्डी सरकारने २०१९ मध्ये तशाच प्रकारचे विधेयक पास केले होते. मात्र या दोन्ही विधेयकांना आजतागायत राष्ट्रपतींची मंजुरी मिळू शकलेली नाही. त्यामुळे बंगालच्या विधेयकावरही तीच वेळ येण्याची शक्यता आहे. अर्थात. यामधील राजकारणाचा विचार करता ममता बॅनर्जी यांनी आपली खेळी केली आहे. आता भाजपला त्यांच्यावर टीका करताना या विधेयकाला अजून केंद्रातून मंजुरी का नाही याचा जबाब द्यावा लागेल. समजा ही मंजुरी मिळालीच तरी त्याचे श्रेय ममता यांच्या सरकारला जाईल व बलात्काऱ्यांविरुध्द कडक उपाययोजना केल्याचा दावा त्या करू शकतील.

## आदित्यनाथांचे काय?

कोलकाता येथील आर.जी. कर इस्पितळात गेल्या नऊ ऑगस्ट रोजी एका निवासी डॉक्टरवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला. या इस्पितळात डॉक्टर वा रुग्णांना कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याचे त्यातून उघड झाले. शिवाय, बलात्कारातील आरोपी हा पोलिस दलासोबत काम करणारा स्वयंसेवक असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे एकूणच ममता बॅनर्जींचे प्रशासन व पोलिस दल याबाबत प्रश्न निर्माण झाले. त्यातच हा गुन्हा नोंदवण्यात विलंब झाला. पोलिसांची भूमिका संशयास्पद राहिली. इस्पितळाचे डीन घोष यांनी हे प्रकरण जवळपास दडपण्याचा प्रकार केल्याने संताप निर्माण झाला. ममता यांच्याविरुध्द वातावरण पेटवण्यासाठी भाजपवाले काही ना काही मुद्दा शोधत असतातच. त्यांनी या घटनेचे भांडवल केले. तेव्हापासून आजतागायत राज्यात सतत आंदोलने, मोर्चे, धरणे व निदर्शने चालू आहेत. मधल्या काळात हा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल झाल्याने त्याचेही या तपासावर नियंत्रण आहे. तरीही रोज नवा मुद्दा घेऊन ममता सरकारविरुध्द आग ओकली जात आहे. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी ममता यांनी अतिशय वेगाने हा कायदा आणला. त्याला विरोध करणे भाजप व इतर पक्षांना अर्थातच शक्य झाले नाही. एकीकडे राज्यातील कायदा सुव्यवस्था ढासळल्याचा आरोप करून भाजपवाल्यांनी ममता बॅनर्जी यांचा राजीनामा मागितला. मात्र त्याच वेळी ममतांनी आणलेल्या विधेयकाला मात्र त्यांना पाठिंबा द्यावा लागला. यावेळी ममता यांनी उत्तर प्रदेशातील उन्नाव, हाथरस, वाराणसी इत्यादी ठिकाणच्या बलात्काराच्या घटनांचे दाखले देऊन नरेंद्र मोदींच्या राजीनाम्याची मागणी केली. आपण एक बोट ममतांवर रोखले तर हाताची उरलेली चार बोटे आपल्याकडे असतात याचे भानही ही मागणी करणाऱ्यांकडे राहिलेले नाही. उत्तर प्रदेशातील गुंडाराज समाप्त केल्याचा दावा मुख्यमंत्री आदित्यनाथ करीत असतात. पण महिला अत्याचारांच्या प्रकरणे दडपण्याचा सर्वाधिक प्रयत्न त्यांच्याच राज्यात झाला आहे.

## दहा दिवसात फाशी अशक्य

महिला कुस्तीगिरांनी अत्याचाराच्या तक्रारी करूनही उत्तर प्रदेशाचा खासदार ब्रिजभूषण उजळ माथ्याने वावरत राहिला. वाराणसी प्रकरणातले गुन्हेगार हे तर भाजपच्या डिजिटल मिडिया सेलचे पदाधिकारी होते व त्यांना २१ दिवस अटक झाली नव्हती. आपल्याकडे बदलापूर प्रकरणात पोलिसांनी तात्काळ गुन्हे दाखल केले नाहीत. त्याबाबत देवेंद्र फडणवीसांनी आजतागायत खेद व्यक्त केलेला नाही. या पोलिसांवर कारवाई होईल का याबाबतही शंकाच आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांबाबतची भाजपची बंगालमधील चीड ही मतलबी व राजकीय आहे. मात्र ममता यांच्या सरकारची पापे त्यामुळे लपून राहू शकत नाहीत. यापूर्वी संदेशखाली प्रकरणातील आरोपीला वाचवण्याचे त्यांच्या मंत्र्यांनी बरेच प्रयत्न केले. आतादेखील आरजी कर इस्पितळाच्या डीनवर नावापुरती कारवाई केली. पण नंतर लगेचच त्यांना दुसरी मोठी नियुक्ती दिली. यामुळे ममतांचे हातही स्वच्छ नाहीत. त्यावर रंगसफेदी करण्यासाठी त्यांनी घाईघाईने हे विधेयक आणले. त्याला कोणी विरोध करण्याची शक्यता नव्हतीच. बलात्काराच्या गुन्ह्यांचा तपास २१ दिवसात पूर्ण व्हायला हवा असे बंधन त्यात घालण्यात आले आहे. शिवाय दोषी ठरलेल्यांना पुढच्या दहा दिवसात फाशी देण्याची तरतूदही त्यात आहे. मात्र आपल्याकडच्या पोलिस व न्याययंत्रणेत या तरतुदींचे पालन होणे अशक्य आहे. तपास लवकर व्हावा असे म्हणणे समजू शकते. मात्र त्याला २१ दिवसांचे बंधन घालणे हे अशास्त्रीय आहे. शिवाय, दोषींना अपिलांच्या असलेल्या अनेक संधी लक्षात घेता तात्काळ फाशी कसे देणार हाही प्रश्नच आहे. पण लोकांच्या मनाचे समाधान करण्यासाठी या तरतुदी कामी येतील. बदलापुरातील आंदोलक गुन्हेगाराला आताच्या आता फाशी द्या असे म्हणतच होते. न्यायाच्या एकूणच प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास उडत चालला असल्याचे हे लक्षण आहे व ते समाजाच्या भल्याचे नाही. त्यामुळे ममता वा त्यांच्यासारख्यांनी असली विधेयके आणण्यापेक्षा पोलिस यंत्रणा सुधारणे व त्यात राजकीय हस्तक्षेप न करणे याकडे अधिक लक्ष द्यायला हवे.

विचार

# चुकीला माफी नाही

गिरीश अवघडे

पश्चिम महाराष्ट्रातली शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद मोडायची असेल तर दंगल पॅटर्न हा एकमेव आवडता मार्ग भाजप आणि संघ परिवाराने निवडला आहे, त्यासाठी गेले अनेक महिने सातत्याने या भागात विशेषत: सातारा/कोल्हापूर जिल्ह्यात वातावरण धुम सत ठेवलं गेलं आहे, सत्तेच्या साथीने दंगलीचा नवा पॅटर्न निर्माण केला गेलाय, विशेष म्हणजे शिवाजी राजेंचा मुस्लिम समाजाने अपमान केल्याची यातील एकही घटना खरी नाही..!! कधी टिपूच्या नावाने तर कधी दर्गा-मशिदीचा वाद निर्माण करून, तर कधी राजेंच्या नावाने अफवा उठवायच्या आणि गावागावातून अत्यंत गुप्तपणे झुंडी बोलावयाच्या, हल्ले करायचे..कागदावर ठरल्यासारखं नियोजन, एखाद्या दिग्दर्शकाने पटकथेप्रमाणे घडवावेत असे प्रसंग, गरज तिथे हिंसा, गरज तिथे मारहाण, गरज तिथे हत्या.

मागच्या दोन निवडणुकांपूर्वी पुणे परिसर महाराजांच्या नावाने अफवेने धुमसला, निवडणुकीत अपेक्षित परिणाम मिळाला, पुणे, सांगली/ कोल्हापूर मध्ये असे प्रयोग सुरू होतेच, तिन्ही जिल्हे बऱ्यापैकी तोडल्यावर, सातारा टार्गेटवर आले, विशेषत: साताऱ्यात दोन्ही राजे, माण-खटाव भागात दोन्ही आमदार जमवल्यानंतर राहिलेला प्रदेश, विशेषतः वाई कराड भाग काँग्रेस राष्ट्रवादीकडून तोडणे, लोकसभा मतदारसंघ मूळ संघ-भाजपच्या उमेदवारासाठी अनुकूल करून घेणे, त्यासाठी ताबडतोड ध्रुवीकरण करणे, हा सगळा प्लान गेली दोन वर्षे सुरु आहे. त्यासाठी सोपा मार्ग म्हणून अनेक धार्मिक स्थळांचा वाद निर्माण केला गेलाय, त्यात मुस्लीम समाजावर एकतर्फी हल्ले केले गेलेत, छत्रपती शिवाजी राजेंचा अपमान केला, अशी अफवा उठवून झुंडीने आक्रमण केले गेले, जिल्हाधिकारी कार्यालयात बेफान झुंडीने पोलीस अधिक्षक मुस्लिम म्हणून त्यांनाही शिव्या घातल्या- तरीही कारवाई काही झाली नाही.

हे सगळं असं पहिल्यांदाच घडले..! वर्धनगड मध्ये रात्री एका घरावर हल्ला केला, निमित्त पुण्यातल्या राहणाऱ्या त्या घरातल्या मुलाने टिपू सुल्तानचा फोटो डीपी वर ठेवला होता..! त्याच्या घरावर काठ्या कुऱ्हाडी घेऊन जमावाने अपरात्री हल्ला केला, घरातल्या तरुणांना बेदम मारहाण केली, घरातील एक वृद्ध व्यक्ती त्या प्रसंगाचा ताण घेऊन मरण पावली, तीन वर्षापूर्वी टिपू सुल्तानचा व्हिडिओ इंस्टाग्रामवर ठेवला होता, त्याचे निमित्त करुन खटाव गावात एका सकाळी शेकडो तरुणांच्या झुंडीने हैदोस घातला, पाच सहा मुस्लीम त्यात काही अल्पवयीन तरुणांना गावच्या चावडी समोर पकडून नेऊन छत्रपती शिवाजी राजेंच्या पुतळ्यासमोर नाक



घासायला लावले, त्यातल्या काही तरुणांची रोजी रोटी उध्वस्त केली, झुंड जमा करण्यास सोपे होईल म्हणून राजेंचा या पिढीत मुलांनी अपमान केल्याची अफवा उठवली गेली होती, जमावात शिकलेले, इंजिनिअर, शिक्षण असे तरुणहीमुस्लिमांच्या मोहल्याजवळ राहणारे, त्यातल्या अनेकांचे मित्र..! सगळं नविनच..काय ते प्रेम..!! या घटनेचा तत्काळ व्हिडीओ बनवून सर्वदूर पसरवला गेला, घटना खरी असेल अशी वक्तव्य करून गोंधळ निर्माण करायचा, नेमके असेच घडले आहे, बरा धडा शिकवला असा प्रचार करायचा..! असा प्रचार प्रसार करण्यास वेगळी टीम..खरे कुणाला समजणार नाही असा जाणीवपूर्वक प्रचाराचा मारा, सगळ्या गोष्टी असत्य, अफवा अर्थात खोट्या..प्रचाराच्या माऱ्यापुढे सत्य कायमचे गुलदस्त्यात..वृत्तपत्रांनीही लिहले नाही, पुसेसावळीत तर कहर करत थेट एका तरुणाची अम ानुष हत्या करण्यात आली, घटना आणि स्क्रिप्ट पुन्हा तशीच..अफवा, खोटे, झुंड आणि हल्ला..बातम्याही दाबलेल्या, पूर्ण सत्य न सांगणाऱ्या..एखादा आत्मा जिवंत असलेला लिहणार..पण खोट्या प्रचाराच्या माऱ्या पुढे दिवा अत्यंत मिणमिणता..विझून जातो लगेच..सगळीकडे महाराजांच्या नावाचा वापर.. शेवटी समाजात माहिती उरते- महाराजांचा अवमान केल्याने, दोन गटात दंगल, एकाचा मृत्यू..! खरे तर खोटी अफवा पसरवून झुंडीने हल्ला निष्पाप तरुणांचे जीव घेतले गेले- त्यांची आयुष्य उध्वस्त केली गेली- हे कुणीच सांगत नाही, कधीच सांगत नाहीत, पेपरवाले, सरकार, पोलीस, जिल्हा प्रशासन, विरोधी पक्ष कुणीच नाही..! खरे बोलणारे माई के लाल जणू पैदाच झाले नाहीत..!! या आणि अशा तब्बल १० ते १२ घटनांच्या मालिकेची चौकशी करून सत्य काय होते हे अद्याप समोरच आले नाही, तसे रेकॉर्ड बनले नाही, नेमके सत्य समोर आणायचे नाही- असा जणू आदेशच, अप-प्रचार झाला की संबंधितांचे काम फत्ते होते, इतर खुळ्यांनी खरे काय हे जाणून न घेता अफवा खऱ्या मानत आपापल्या पद्धतीने निषेध करायचा, आगीत तेल ओतायचे, धार्मिक विद्वेषाच्या उलट्या करायच्या.. हे सगळं सगळ्या ठिकाणी सारखेच. संबंधितांचा हेतु पूर्ण साध्य..एका संविधान प्रेमी अभ्यासक समूहाने सगळ्या घटनांचा प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन सत्यशोधन करत अहवाल पोलिसांपुढे सादर केला, पण तो केव्हाच बाहेर आला नाही, खरे काय घडले याबाबत अद्यापपर्यंत यंत्रणेचे अधिकृत भाष्यच नाही, म्हणजे अफवा खरी होती हेच जनमानसात कायम राहीले आहे, तोच तर खरा हेतू होता.

त्यातल्या त्यात चाथवणीखोर भाषणे करणाऱ्यांवर कारवाई नाही म्हणून विषय न्यायालयात गेला आहे, न्यायालयाने चौकशी करण्याचे आदेश पुन्हा पोलिसांनाच दिलेत, पोलीस दल आपल्या स्वार्थासाठी कोणत्या स्तरापर्यंत वापरावे हे या भाजप सरकारने आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिले आहे, उत्तरप्रदेश, आसाम आणि महाराष्ट्रात फरक असा उरला नाही, मोजक्या अधिक गंभीर ठिकाणी तुटपुंज्या कारवाया झाल्या खऱ्या, पण धर्माच्या नावाने माथी भडकावलेल्या झुंडीत सहभागी अंध तरुणांवर..! त्यांच्यावर अधिक कडक कारवाई व्हायलाच हवी होती, पण यामागचे खरे मास्टर माइंड केव्हा पकडले जाणार आहेत का..? ते कोण आहेत हे उघड असूनही कारवाई होत नाही, होणारही नाही.

यात द्वेषी मनोहर भिंडे कारवाईच्या कक्षेबाहेर आहे, कारण त्याने हे सरकार सत्तेत आणण्यासाठी दीर्घकाळ माथी भडकवली आहेत, आणि म्हणून उलट भिडे सगळीकडे सन्मानित केला जातोय, महाराजांच्या नावाचा आणि त्यांच्या विचारांचा गैरप्रचार करुन संघाने नेमून दिलेले काम तो करतोय. बाकी आसपासचे स्थानिक शिवराळ भाषा वापरून राजकारणात चमकू इच्छिणारे तुंप भात खाणारे अचानक तिखट राजकीय नेते झालेत, हात पाय तोडण्याची, कापण्याची भाषा जाहीरपणे बोलू लागलेत, सरकारी संरक्षणात त्यांच्या पार्श्वभागात तात्पुरता ऊसना दम आलाय, पण तो ही बोलण्यापुरता..बाकी बहुजन, शेतकऱ्यांची गरीब बेरोजगार तरुण गाळाला लावून दंगलीत वापरली जातात, गुन्हे दाखल झाले की त्यांना वाऱ्यावर सोडून दिले जाते, त्या उसन्या दमाच्या पेशवाई समर्थकांवरही कारवाई झालेली नाही, यांच्यासह प्रत्येक घटनेवेळी महाराजांचा अपमान झाल्याच्या अफवेला खरे मानून चिरण्या फाडण्याची भाषा करणारे माध्यमातील तथाकथित पत्रकार खरे तर अलीकडे थेटपणे दलाली करणारी संघाची पिलावळ आता गप्प आहे, बाकी मिरवणारे नेते एवढेच काय छत्रपतींचे वंशजही गप्प गार आहेत, विशाळगडावर महाराजांवर अत्यंतिक प्रेम दाखवणारे राजे तर गायबच आहेत, राजकोट इथे महाराजांच्या पुतळ्याबाबत घडलेली घटना जसे या सगळ्यांना अद्याप समजलेलीच नाही..ढोंगी कुठले.. लाचार..पदांना हापापलेले. संघवाल्यांचे नोकर.. राजेंवर दाखवले जाणारे यांचे प्रेम राजकीय आहे, हे सत्य समोर आणण्यास ही एक घटना पुरेशी आहे, आताही बहुजनांना कळत नसेल तर इतिहास वाचा, किमान साथी गोविंद पानसरे यांचे छोटेखानी पुस्तक - शिवाजी कोण होता- वाचा..दिसेल तुम्हाला की राजेंसह प्रत्येक महापुरुषांचा या संघवाल्यांनी द्वेष केलाय, २००४ च्या सुमारास उघड झालेले जेम्स लेन प्रकरण आठवा, भांडारकर संस्थेचा त्यातील सहभाग आठवा, भाजप- संघवाल्यांनी सातत्याने महाराजांविषयी केलेली वक्तव्य आठवा, मोदींची महाराजांशी तुलना आणि नितीन गडकरी अलीकडचे राजेंपेक्षा नवे आदर्श असल्याचे तत्कालीन राज्यपाल कोश्यारीचे वादग्रस्त वक्तव्य आठवा.. फार काही आठवत नसेल तर राजकोटच्या घटनेनंतरचे यांचे वागणे बारकाईने पाहा.. भाजपमध्ये गेलेले मराठे कसे वेगळे वागतात पाहा..राजेंबाबत पुतना मावशीचे असलेले त्यांचे खोटे प्रेम स्पष्टपणे दिसेल.. आणखी अशीच शेकडो उदाहरणे देता येतील.. राजकोटचे उदाहरण अत्यंत ताजे आहे, विषय माफी मागून संपणारा नाही.. शंभर काय हजारवेळा मागितली तरी नाही!! यावेळी खरंच चुकीला माफी नाही.

आजकाल

# आर्यन मिश्राचा खून आणि विवेकानंद यांची आठवण

आर्यन मिश्रा या १९ वर्षांच्या तरुणाची काही गोगुंडांनी (तथाकथित गोरक्षकांनी) २३ ऑगस्टला फरीदाबादमध्ये गोळ्या घालून हत्या केली. यांना गोरक्षक म्हणण्याऐवजी गोगुंड म्हणणे अधिक योग्य. यापूर्वी या गोगुंडांनी अनेक मुस्लिम व्यक्तींचे खून केले आहेत. आता त्यांनी हिंदू तरुणालाच ठार मारले आहे.

हे गोरक्षेच्या नावाखाली वावरणारे पाखंडी लोक आजच तयार झालेले नाहीत. स्वामी विवेकानंद यांच्या काळात देखील ते होते आणि अशा एका गोरक्षकाच्या स्वामी विवेकानंदांसोबत झालेल्या भेटीचा किस्सा शरदचंद्र चक्रवर्ती यांनी नोंदवून ठेवला आहे. हा किस्सा रामकृष्ण मठाने प्रकाशित केलेल्या 'वामी विवेकानंद ग्रंथावली'च्या तिसऱ्या खंडात आहे. ही भेट १८९७ मध्ये कलकत्त्यातील बागबाजार भागातील प्रियनाथ मुखोपाध्याय यांच्या घरात घडली.

शरदचंद्र चक्रवर्ती लिहीतात, ''मिरर पत्राचे संपादक नरेंद्रनाथ सेन निघून गेल्यावर गोरक्षण मंडळाचा एक प्रचारक स्वामीजींच्या भेटीला आला. पूर्ण जरी नसला तरी त्याचा वेष काहीसा संन्याशासारखा होता. डोक्याला भगव्या रंगाचा फेटा. चेहरा पाहताच तो उत्तर हिंदुस्थानी असल्याची खात्री पटावी. तो आल्याचे कळताच स्वामीजी समोरच्या खोलीत आले. स्वामीजी येताच त्यांना वंदन करून त्याने गाईचे एक चित्र स्वामीजींना दिले. जवळच बसलेल्या माणसाच्या हाती ते चित्र देऊन स्वामीजींनी त्याच्याशी बोलावयास सुरवात केली.

स्वामीजी: आपल्या या मंडळाचा उद्देश काय?

प्रचारक: आम्ही देशातील गाईंची कसायांच्या हातून सुटका करतो. जागोजाग गोशाळा बांधून तेथे रोगी, दुबळ्या आणि कसायांच्या हातून सोडविलेल्या गाईंचे पालनपोषण करतो. स्वामीजी: फार चांगले काम आहे आपले हे. हा खर्च चालवायला पैशाची काय व्यवस्था करता तुम्ही?

प्रचारक: आपल्यासारखे उदार लोक दयाबुद्धीने जे काही देतात त्यातूनच हा खर्च आम्ही चालवितो.

स्वामीजी: आजपावेतो आपल्यापाशी किती पैसा जमला आहे? प्रचारक: मारवाडी व्यापारी या कामात सढळ हाताने पैसा ओततात. त्यांनी या कामासाठी बराच पैसा दिलेला आहे.

स्वामीजी मध्यभारतात भयंकर दुष्काळ पडला आहे. खुद्द सरकारने नऊ लाख लोक 'अन्न अन्न' करीत मेल्याचे आपल्या अहवालात जाहीर केले आहे. आपल्या मंडळाने या भूकेलेल्यांना मदत करण्यासाठी काही करण्याचे ठरविले आहे काय? प्रचारक: असल्या दुष्काळ- बिष्काळाच्या कामात आम्ही भाग घेत नाही. गोमातेचे रक्षण करण्याच्या हेतूनेच आमचे हे मंडळ स्थापन झाले आहे. स्वामीजी: लाखोंच्या संख्येने 'अन्न अन्न' करून आपल्या सारखीच माणसे दुष्काळात मरत असताना, शक्य असूनही त्यांना पोटाला अन्न देऊन मदत करणे तुम्हाला योग्य वाटत नाही काय? प्रचारक: नाही. हा दुष्काळ म्हणजे त्यांच्या कर्माचे, पापाचेच फळ होय. जसे करावे तसे भरावे. जसे कर्म तसे फळ.

प्रचारकाचे हे उत्तर ऐकून स्वामीजींचे मुखमंडळ अगदी लाल झाले आणि त्यांच्या त्या विशाल डोळ्यातून जणू आग बाहेर पडू लागली. पण संतापाची ती ऊर्मी आतल्याआत दाबून ते म्हणाले, ''ज्या सभा, जी मंडळे माणसासारख्या माणसाकडे सहानुभूतीच्या दृष्टीने पाहत नाहीत, आपलेच बंधुबांधव उपासमारीने तडफडत मरत असल्याचे पाहूनही त्यांचे प्राण वाचविण्यासाठी एक म ूठ धान्य न देता पशुपक्ष्यादिकांचे प्राण वाचविण्यासाठी धान्याचे ढीगचे ढीग वाटण्याकरता जे पुढे सरसावतात, त्यांच्याबद्दल मला काडीचीही सहानुभूती वाटत नाही. अशांच्याकडून समाजाचा काही विशेष फायदा होणे सर्वथा अशक्य होय, असे माझे मत आहे. माणूस आपल्या कर्माने मरतो असे म्हणून कानावर जर हात ठेवले तर जगात प्रयत्नाला काही अर्थच रहाणार नाही. आणि मग गाईना वाचविण्याच्या तुमच्या या धडपडीला तरी काय अर्थ? आपल्या कर्मानीच गाई कसायाहाती पडतात आणि मरतात. आम्ही त्यांच्यासाठी अंगमोडून काम करण्यालाही अर्थच नाही.''प्रचारक तर हे ऐकून किंचित हादरलाच. पण स्वतःला सावरून तो म्हणाला, ''आपण म्हणता ते खरेच. पण शास्त्रात सांगितले आहे की गाय आपली आई आहे.''

यावर किंचित हसून स्वामीजी म्हणाले, ''हो, गाय आपली आई आहे हे तर उघडच दिसते आहे. एरवी असली अलौकिक प्रजा आणखी कुणापोटी निपजणार?''

स्वामीजींनी मारलेला हा टोमणा त्या प्रचारकाच्या लक्षातच आला नसावा असे दिसले. अधिक चर्चा न करता, स्वामीजींनी या कार्याला काही मदत करावी अशी त्याने विनंती केली. स्वामीजी: हे बघा, मी तर हा असा संन्यासी, फकीर. तुम्हाला द्यावयाला माझ्यापाशी कुठून बरे पैसा येणार? आणि 'यदाकदाचित माझ्या हाती पैसा आलाच तर तो मी आधी माणसांच्या सेवेसाठी खर्च करीन.' प्रथम वाचवावयास हवा माणूस- आधी त्याला द्यावयाला हवे अन्नदान, विद्यादान, धर्मदान. हे सारे करून जर माझ्या हाती काही शिल्लक राहीले तर मी तुमच्या संस्थेला काही देऊ शकेन.

स्वामीजींचे बोलणे ऐकून त्यांना नमस्कार करून तो प्रचारक निघून गेला. 'तो गेल्यावर स्वामीजी पुढे म्हणाले, ''काय पण बोलला! म्हणे की माणूस मरतो आपल्या कर्मानी, त्याला दया दाखवून काय होणार? देशाचा अधःपात झाल्याचे ह्याच्याइतके दुसरे स्पष्ट प्रमाण नाही. हिंदुधर्मातील तुमचा कर्मवाद कोणत्या अधोगतीला जाऊन पोचला आहे हे पाहीले? म ाणसासारखा माणूस असून माणसासाठी ज्याचे हृदय द्रवत नाही, त्याला काय माणूस म्हणायचे?'' हे बोलत असताना स्वामीजींचे सारे अंग क्षोभ आणि दुःख यांनी थरारून गेले.

'करुणामय स्वामीजी आज हयात असते, तर आजच्या क्रूर खूनी गोगुंडांबाबत काय म्हणाले असते? याची कल्पना करणे कठीण नाही. ते जे म्हणाले असते, ते आज आपण सर्वांनी म्हणण्याची गरज आहे!

लोकसंसद

## न विरघळलेल्या मूर्तींचे फोटो काढू नका!

लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन आता अवघ्या काही तासांवर आले आहे. बाजारपेठा सजल्या आहेत. सर्वत्र उत्साह शिगेला पोहोचला आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी पूजेचे साहित्य, प्रसादाची तयारी, आकर्षक आरास, रोषणाई, सजावट अशा सर्व प्रकारची तयारी पूर्णत्वास गेली आहे. बाप्पाची प्रतिष्ठापना झाल्यानंतर घराघरात देवदेवतांच्या आरत्यांच्या आणि 'गणपती बाप्पा मोरया' गजर गुंजणार आहे. मात्र बाप्पाच्या आगम नानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी दीड दिवसांच्या गणपतींच्या विसर्जनापासून अनंत चतुर्दशीपर्यंत विविध दिवशी गणपती बाप्पाचे विसर्जन होणार आहे. यंदा ८, ११, १२, १३ आणि १७ सप्टेंबर या दिवशी गणपतीचे विसर्जन होणार आहे. या अनुषंगाने मुंबई पोलिसांनी काही आदेश जारी केले आहेत. बऱ्याचवेळा विसर्जनानंतर पाण्यात काही पूर्णपणे न विरघळलेल्या मूर्ती भरतीच्या वेळी किनाऱ्यावर परत वाहून येतात. काही नतद्रष्ट महाभाग अशा न विरघळलेल्या मूर्तीचे फोटो काढतात आणि समाजमाध्यमांवर वायरल करतात. त्यामुळे असे फोटो तसेच प्रसारित करणाऱ्या संबंधित व्यक्तीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ नुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## ठेवीदार अद्याप वाऱ्यावरच

आपले मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री मिळून आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी विजमाफी, लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, अन्नपूर्णा योजना अशा अनेक कल्याणकारी योजना घेऊन येत आहेत. बळीराजा सुखी होण्यासाठी देवाकडे साकडे घालत आहेत. लाडक्या भावांसाठी, दहावी पास झालेल्यांसाठी, पदवी झालेल्यांसाठी वेतन वगैरे कितीतरी योजना राबवत आहेत. आपले सरकार वेगवान व गतीशील आहे. सर्वसामान्यांच्या पाठीशी आहे, अशी प्रत्येक पत्रकार परिषदेमध्ये योजनांची उधळण करीत असतात. हे सर्व छान व स्वागतार्ह्य आहे. पण रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँक गेले १४ वर्षे बंद पडली आहे, त्याकडे लक्ष द्यायला आपल्या सरकारकडे वेळ नाही. बेनामी कर्जवाटप केल्यामुळे आरबीआयने त्या बँकेवर निर्बंध घातले व रातोरात बँक बंद पडली. आज सुमारे १,९०,००० ठेवीदारांचे स्वकष्टार्जीत पैसे त्या बँकेत अडकून पडले आहेत. बहुतांश ठेवीदार आता सुपर म्हणजेच ज्येष्ठ नागरिक झाले आहेत. त्यांना औषधपाण्याला दुसऱ्यांकडे भीक मागावी लागत आहे. हे सर्व त्या सरकारमधील त्या तिघांनाही माहीत आहे. परंतु ते काहीही करु शकत नाही, ही खरच शोकांतिका आहे.

**- प्रकाश वा.दातार,** तळेगाव दाभाडे.

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**६ सप्टेंबर**

**१७९०:-** थोर मराठी कवी, चरित्रकार महिपतीबुवा ताहराबादकर यांचा जन्म. 'भक्तविजय, संतविजय आणि संतलीलामृत' हे ओवीबध्द चरित्रग्रंथ त्यांनी लिहिले. त्यांच्या लिखाणाचा भर मात्र संत तुकारामांच्या शिकवणी पासून अगदी निराळा होता. 'शनिमहात्म्य', 'माघमहात्म्य', 'एकादशीत्म्य', 'कथासारामृत', 'तुलसीमहात्म्य', 'वैशाखवृत्त' अशा अनेक मराठी पोथ्या महिपतीबुवा ताहराबादकर यांनी लिहिल्या.

**१९२०:-** जुन्या पिढीतील एक साहित्यिक, ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक विठ्ठल श्रीनिवास देशिंगकर यांचा जन्म. 'गणपती व्रत' हे गणेशउपासनेवर तर 'जन्मांग ज्योतिष', 'त्रियोगात मी', 'दैवारंभ', 'दांपत्य प्रारब्ध योग', 'पॅकेट ज्योतिषी', 'मी कोण? विवाह चिकित्सा' आदी पुस्तकांतून ज्योतिष शास्त्राचा परिचय त्यामध्ये 'अंकशास्त्रावरुन भविष्य, स्वप्न, शकून, राजयोग, दारिद्र्य, धनयोग आदीचा परिचय. याशिवाय 'व्रत शिरोमणी भाग १,२,३ मधून वर्षभरातील सर्व व्रते व त्यासंबंधी सर्व माहिती दिली आहे.

**१९३६:-** लेखक डॉ. सुहास बाळ देव यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'इथे संताचिये नगरी, देवाचिये द्वारी, ज्ञानेश्वरांचे गीतकाव्य, कोरीव लेणे (काव्यसंग्रह) आणि 'काय सांगू कथा' हा कथासंग्रह प्रसिध्द. **१९४६:-** 'निहार' मासिकाचे संपादन आणि विविध नियतकालिकातून लेखन करणाऱ्या लेखिका स्नेहसुधा अ. कुलकर्णी-अंबाडे यांचा जन्म. 'उध्वस्त', 'जिंकूनी अजिंक्य मी', 'पतिव्रता', 'प्रवास', 'सखे गवसली प्रीत', 'हरे राम हरे कृष्ण', 'क्षण मोहाचा' या कादंबऱ्या.'स्नेहमयी', 'आत्मभान', 'सावलीच्या शोधात' हे काव्यसंग्रह तर 'दु:खाची जात', 'पाच तीन दोन' ह्या कथासंग्रहासह त्यांच्या बालसाहित्यात 'एक होता राजा', 'पप्पू बल्लची गाणी' आणि 'सुलभ पंचतंत्र' ह्या किशोरांसाठी कथा अशी साहित्य संपदा.**१९४९:-** मराठीतील बेने इस्त्रायली नाटककार आणि 'आलम आरा' या पहिल्या बोलपटाचे कथाकार जोसेफ दाविद पेणकर यांचे निधन. 'मक्काबी वीरांचे शौर्य', 'राजपुत्र अबुसालेम','एस्तर राणी', 'सत्त्वशील आबिगाएल', 'रशिया तील यहुदी कन्या', 'रोमन राजा टेटस' अशी नाटके लिहून त्यांनी बेने इस्त्रायली धर्मकथांचा परिचय महाराष्ट्राला करुन दिला. 'दाविदाख्यान' आणि 'महाराणी एस्तरचे बुध्दिचातुर्य' आदी मराठी कीर्तनांच्या पद्यावली त्यांनी रचल्या होत्या. **१९५३:-** वृत्तपत्र स्तंभलेखक डॉ.सुधाकर हिरालालजी डेहणकर यांचा जन्म. 'गीतज्योती' हे दीर्घकाव्य. **१९५३:-** कथाकार मंगला झेड डहाके यांचा जन्म. त्यांच्या नावावर 'कोंदण', 'प्रिय सखीस' हे कथासंग्रह आढळतात. **१९६२:-** 'रॅस रेस', 'डायरी' यासारख्या गाजलेल्या कथासंग्रह लेखक पंकज कुरुलकर यांचा जन्म. 'बार अँड रेस्टॉरंट' हे त्यांचे आणखी काही कथासंग्रह. 'तमसो मा','अनादि अनंत', 'जंगल' ह्या कादंबऱ्या. 'मनोमीलन' हे नाटक आणि काही इंग्रजी कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## निवडक

### शिक्षक दिन उत्साहात

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन येथील ५ सप्टेंबर रोजी गोखले महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजनाचा हेतू सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. कल्याणी नाझरे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये स्पष्ट केला. प्रा. उल्हास खोपकर यांनी त्यांच्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी आपले भवितव्य घडविताना शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे नमूद केले.

### रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी

**उरण :** कामगार नेते महेंद्र घरत यांनी सुप्रिटेंड इंजिनीयर व सिडको अधिकारी यांच्या समवेत उलवे नोड मधील रस्त्यांची पाहणी केली. गणपती सण दोनदिवसांवर येऊन ठेपला असतांना सर्वसामान्य नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुरावस्था झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी महेंद्र घरत यांनी सिडको अधिकारी व सुप्रिटेंड इंजिनीयर यांच्याकडे केली आहे. यावर सिडको अधिकारी व सुप्रिटेंड इंजिनिअर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### गणेशपूजा साहित्य वाटप

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गणेश भक्तांना गणेशोत्सवानिमित्ताने ग्रामविकास परिवर्तन आघाडीतर्फे मोफत पूजा साहित्याचे वाटप करण्यात आले. यापूर्वी देखील मापगाव ग्रामपंचायत विभागात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा आदी क्षेत्रातील उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले आहेत. यावेळी पूजा साहित्यामध्ये अगरबत्ती, धूप, तेल आदी साहित्यांसह आरती संग्रह पुस्तकांचा समावेश आहे.

### मातृदिन उत्साहात साजरा

**माणगाव :** तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात मंगळवारी (दि.३) मातृदिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक संतोष कद, माता पालक संघाचे सदस्य तसेच विविध समितींचे पदाधिकारी, सदस्य यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मातृदिनाचे औचित्य साधून मातापालकांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

### शैक्षणिक साहित्य वाटप

**माणगाव :** तालुक्यातील माध्यमिक शिक्षक संघटना महाडच्यावतीने रातवड विद्यालयात बुधवारी (दि.४) शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर क्रिकेट संघटनेच्यावतीने विविध प्रकारचे शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सहाय्यभूत व्हावे या उद्देशाने संघटनेच्यावतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाच्यावतीने संघटनेचे आभार व्यक्त करण्यात आले.

## सुखकर प्रवासासाठी रायगड पोलीस सज्ज

# महामार्गावर तिसऱ्या डोळ्याची गस्त

**। गडब । वार्ताहर ।**

गणेशोत्सवानिमित्त मुंबई ठाण्यात राहणारे चाकरमानी कोकणात येण्यास सुरुवात झाली आहे. यावेळी गणेश भक्तांचा प्रवास सुखकर होण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावर वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी रायगड पोलीस प्रशासन सज्ज झाले आहेत. खारपाडा ते कशेडी घाट दरम्यान ७ विभागात वाहतुकीचे नियोजन केले असून महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तर, रहदारीच्या महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस चौक्यांसह, रुग्णवाहीक आणि क्रेनचीसुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे.

गणेशोत्सव हा कोकणवासीयांचा महत्वाचा सण मानला जातो. यासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथून अनेक चाकरमानी हे कोकणातील आपल्या घरी जात असातात. यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सुमारे १४५ किलोमीटरच्या मार्गावर पोलीस कर्मचारी आणि अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तर, रायगड जिल्ह्यातील या मार्गावरील महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. यामुळे वाहतूक नियंत्रणासाठी मदत होणार आहे. या बंदोबस्तात ७ उपविभागिय पोलीस अधिकारी, ११ पोलीस निरिक्षक, ४२ सहाय्यक पोलीस निरिक्षक, ८२ वाहतुक आमलदार, २११ पोलीस आमलदार, २७ वॉकीटॉकी, १० वायरलेस सेट, १० टोईंग क्रेन, १० रुग्न वाहीका, २९ सीसीटिव्ही कॅमेरे असणार आहेत.






> मुंबई-गोवा महामार्गावरुन गणेश भक्तांना घेऊन अनेक बसेस व छोटी-मोठी वाहने जाणारा आहेत. या गणेशभक्तांचा प्रवास सुखकर होण्यासाठी व गणेश भक्तांच्या प्रवासात कोणताही अडथळा न येण्यासाठी पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांनी सर्तक राहा. महामार्गावर शासनामार्फत गणेश भक्तांच्या सोयीसाठी सुविधा केंद्र, वैद्यकीय मदत केंद्र उभारली आहेत त्याची माहीती प्रवाशांना द्या. सहनशिलतेने जबाबदारीने काम पार पाडा. गणेश भक्तांना मदत करा.
>
> – सोमनाथ घार्गे, रायड पोलिस अधिक्षक

यासंदर्भात मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतुक नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजनांची व वाहतुक नियंत्रणासाठी नेमणुक केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक पेण तालुक्यातील गडब येथील काळंबादेवीच्या मंदिराच्या सभागुहात घेण्यात आली होती. यावेळी रायगड पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागिय पोलीस अधिकारी नितिन चौधरी, शिवाजी फडतरे, दौडकर, जिल्हा वाहतुक पोलिस निरिक्षक एस.व्ही. लांडे, वडखळ पोलिस निरिक्षक प्रसाद पांढरे, पेण पोलिस निरिक्षक संदिप बागुल, दादर सागरी पोलिस निरिक्षक नागेश कदम आदिंसह पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्यावतीने

# मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



गणेशोत्सवाकरिता शहरातून गणेश भक्त आपल्या मुळ गावी येत असतात. हा उत्सव येत्या दोन दिवसांत येत असुन तदपुर्वी आपल्या शहरात स्वच्छता असावी, गणेशभक्तांना यांचा त्रास होऊ नये याकरिता पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, देवेन सतविडकर, इम्यियाज शाबान, शैलेश वारेकर यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. हे निवेदन मुख्याधिकारी यांच्यावतीने नगरपरिषदेचे कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार यांच्याकडे देण्यात आले. यावेळी वरिष्ठ लिपिक नरेंद्र नांदगावकर उपस्थित होते.

निवेदनात असे नमुद केले आहे की, सालाबादप्रमाणे पारंपारिक गणेश उत्सव दि.७ ते १७ सप्टेंबर या दरम्यान असणार आहे. तरी नगरपरिषदेच्यावतीने मुरुड शहरातील परिसर रोजच्या रोज स्वच्छ करणे, प्रत्येक पाखाडीत गटारालगत वाढलेली झाडी तोडण्यात यावी, सिमेंट कॉंक्रेट रस्त्यावर शेवाळ पकडलेली आहे त्यावर पावडर मारणे, डासांचे प्रमाण मुरूड शहरात मोठ्या प्रमाणात वाढल्याने फवारणी करणे, समुद्रालगत बांधलेली गटारं तुंबल्याने तेथे दुर्गंधी पसरली आहे त्यावर उपाययोजना करणे. तसेच, समुद्र किनारी रस्त्यालगत गटाराचे बांधकाम चालु असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होउन एखादी दुर्घटना होऊन कोणाला दुखापत होऊ नये म्हणुन गटार लाईनचे बांधकाम लवकरात लवकर पुर्ण करावे. अश्या विविध समस्यांवर उपाय करुन गणेशभक्तांना दिलासा द्यावा, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्यावतीने करण्यात आली आहे.

# शिल्पांच्या देखभालीची गरज



**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याचे अतिशय आकर्षक असे सुशोभीकरण करण्यात आले असून दि. ३ डिसेंबर २०२३ रोजी उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले होते. या सुशोभीकरण प्रकल्पाचा फायदा येथील लॉजेस, हॉटेल्स, खाद्य पदार्थ विक्रेते, घोडा गाडीवाले, ऊंटवाले इ. अनेक व्यावसायिकांना झाला आहे. तसेच, या सुशोभीकरणामुळे पुणे-मुंबई व अन्य शहरांकडून पर्यटकांची संख्या वाढली असून पार्कींगसाठी श्रीवर्धनचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. यामुळे समुद्र किनाऱ्याजवळ वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात.

समुद्र किनाऱ्यावरील शुशोभीकरणात खेकडा, मासा व अन्य शिल्प उभारण्यात आले आहेत. ही शिल्पे टाकाऊ वस्तूंपासून बनवण्यात आलेली आहेत. यांची नगर परिषदेच्यावतीने स्वच्छता-देखभाल केली जाते. तरी ही शिल्पे जोरदार पावसामुळे गंजत आहे. ती दीर्घकाळ टिकून रहावीत याकरिता नगर परिषदेने या शिल्पांची रंगरंगोटी किंवा रेड ऑक्साईड वा अन्य गंज रोधक लावून त्यांचे आयुष्य व सौंदर्य वाढवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# राष्ट्रीय पोषण महिना साजरा



**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

भारत देश हा कृषिप्रधान देश असून विविध संस्कृतीने नटलेला आहे. त्याचे संरक्षण हे आपल्या हातात आहे. त्याचप्रमाणे उत्तम आरोग्यासाठी उत्तम आहार आवश्यक आहे. कोकणात विवीध रानभाज्या मुबलक प्रमाणात आढळून येतात आणि ग्रामीण कुटुंब त्याचे पुरेपूर सेवन करतांना आढळतात. याबद्दल विशेष जनजागृती करणे तसेच भरड धान्य आणि कडधान्याचे महत्व पटवून देण्यासाठी अदानी फाउंडेशन प्रयत्नशील आहे. यावेळी राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रम वडवली येथील आगरी भंडारी समाज भवन येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रमुख अधिकारी अमिता भायदे, प्रशासक भरत कुबेर, अदानी फाउंडेशन डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर जयश्री काळे आणि सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस उपस्थित होत्या.

# ‘सुदर्शनधारी महागणपती’चे आगमन

**। पनवेल । वार्ताहर ।**



सार्वजनिक गणेशोत्सवातून प्रबोधन आणि जनजागृतीसह निखळ भक्ती आणि अधर्माविरुद्ध लढण्याची शक्ती निर्माण करताना कांतीलाल प्रतिष्ठान रायगडने यंदाच्या १४ व्या वर्षी ‘सुदर्शनधारी महागणपती’चा देखावा निर्माण केला आहे.

मुंबई-लालबाग येथील प्रख्यात मूर्तिकार निखिल राजन खातू यांच्या कलेचा मूर्तिमंत आविष्कार पहायला मिळणार आहे. बुधवारी सकाळी पनवेलच्या महागणपतीचे मुंबईतील कार्यशाळेतून पनवेलकडे प्रस्थान झाले. पनवेलमध्ये येताच देवनगरीचा आनंद ओसंडून वाहत होता. वरुणराजानेही हजेरी लावत महागणपतीचे जोरदार स्वागत केले. यावेळी पनवेल बस स्थानकासमोरील उड्डाणपुलाखाली बाप्पाचे आगमन होताच रूपा कडू, प्रिया पाटील आदींनी बाप्पाचे औक्षण केले. पनवेलचा महागणपती मुंबईतून पनवेलला आणणाऱ्या पथकात कांतीलाल कडू, आनंद पाटील, मनोहर म्हात्रे, दीपक पाटील, किरण करावकर, हरेश पाटील, राकेश केणी, राजेंद्र पगारे, किरण पवार, रोहित शेलार, भूषण गोंधळी, आक्रम खान, शर्वाय कडू, प्रिन्स कोळी, तनिष्क पाटील आदींचा सहभाग होता.

दरम्यान, यंदा ‘पनवेलचा महागणपती’साठी श्री कृष्णाचा महाल तयार करण्यात आला आहे. साडेसात हजार चौरस मिटरचा शामियाना उभारण्यात आला असून मुंबई तथा कोकणातील हा सर्वात मोठा भव्यदिव्य महाल असल्याचे बोलले जात आहे.

# पेणमध्ये पोलिसांचे संचलन

**। पेण । प्रतिनिधी ।**

आगामी येणाऱ्या गणपती उत्सवाचा विचार करून शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था आबादीत रहावी यासाठी पेण पोलीस ठाण्याकडून संचालनाचे आयोजन करण्यात आले होते. पेण एसटी स्थानकापासून संचलनाला सुरूवात करण्यात आली. तसेच, पुढे धरमतर रोड, कोतवाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जामा मस्जिद खान मोहल्ला, भगवानदास चौक, खाटीक मोहल्ला, पंका पाटील चौक, राजू पोटे मार्ग, नगरपालिका चौक असे संचलन करत पुन्हा एसटी स्टँडकडून डीवायएसपी ऑफीस आवारात या संचलनाचे विसर्जन करण्यात आले. या संचलनात डी.वाय.एस.पी शिवाजी फडतरे, पोलीस निरिक्षक संदीप बागुल, सहाय्यक पोलीस निरिक्षक पाटील, महिला उपपोलीस निरिक्षक शिल्पा वेंगुर्लेकर याचा समावेश होता.

# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा संपन्न

**। पनवेल । वार्ताहर ।**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३४वे पुष्प पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात संपन्न झाली. या कार्यक्रमात पुणे येथील युवा गायिका ईश्वरी कुलकर्णी-श्रीगार यांनी आपली सेवा सादर केली. ईश्वरी ह्यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात राग श्याम कल्याण मधील ‘जियो मेरो लाल’ ही बंदिश आणि ‘सावन की सांज भयी’ ही बंदिश गाऊन केली. तसेच, अभंग आणि नाट्यगीते देखील सादर केली. तसेच, ‘तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल’ या अभंगाने त्याने संगीत सभेची सांगता केली. यावेळी राजेंद्र काळे यांनी संवादिनी, शार्दुल डोंगरे तबलासाथ व गणेश घाणेकर यांनी तालवाद्यसाथ केली.

# ‘गणेशोत्सव शांततेत पार पाडा’

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



आगामी गौरी गणपतीचे सण अत्यंत शांततेत आणि गुण्या गोविंदाने पार पाडावेत तसेच कोणत्याही प्रकारचे कायदा सुव्यवस्थेचे उल्लंघन करू नये. समुद्रात विसर्जन प्रसंगी योग्य ती काळजी घ्यावी. यासाठी नागरिकांनी कायद्याच्या चौकटीत राहूनच सण उत्सव साजरे करावेत, असे आवाहन अलिबाग उप विभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी यांनी केले. आगामी गणेशोत्सव व ईद या सणांच्या अनुषंगाने मुरुड पोलीस ठाणेतर्फे दर्या सारंग सभागृहात शांतता समितीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पुढे चौधरी म्हणाले की, जिल्हाधिकाऱ्यांच्या समवेत झालेल्या बैठकीत गणेशोत्सवा दरम्यान विद्युत बील थकित असले तरी कनेक्शन न तोडण्याचे सूचित करण्यात आले आहे. तसेच, गणेश विसर्जन करताना मिरवणूकीच्या वेळी ध्वनी प्रदुषणाची मर्यादा पाळा. रस्त्यात व्यत्यय येईल अशा हातगाड्या व वाहनांचा चोख बंदोबस्त ठेवा. उनाड गुरांच्या मालकांवर थेट खटले दाखल करून अशी गुरे गोशाळेत पाठवा. तसेच, नगर परिषदेला पोलिस संरक्षण मिळेल याची ग्वाही देखील विनित चौधरी यांनी दिली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी यांचा स्वातंत्र्यदिनी राष्ट्रपतीतर्फे पोलिस पदक २०२४ जाहीर झाल्याबद्दल पोलीस निरीक्षक उदय झावरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी पोलीस उपनिरिक्षक अविनाश राठौड, अविनाश पाटील, सहा फौजदार दिपक राऊळ, संतोष कचरे, परेश कुंभार आदी मान्यवर तसेच नगरसेवक प्रमोद भायदे, नयन कार्णिक, श्रीकांत सुर्वे, डॉ. राज कल्याणी, जाहिद फकजी, शकील कडू, मनोहर मकू, वासंती उमरोटकर आदी उपस्थित होते.

# भोरमार्गे पुणे बससेवेची मागणी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड येथून पुण्यात जाण्यासाठी वरंध भोर मार्ग हा जवळचा मार्ग असुन अतिवृष्टी व घाटातील रस्ता रुंदीकरण कामामुळे हा घाट वाहतूकीसाठी बंद करण्यात आला होता. मात्र, आता या घाटातून वाहतूक सुरु झाली असुन सध्या महाड-पुणे बस ताम्हिणीमार्गे जातात त्या बस आता भोरमार्गे सुरु कराव्यात, अशी मागणी महाड पत्रकार संघाच्यावतीने आगार व्यवस्थापकांना करण्यात आली आहे.

महाड येथुन पुणे या ठिकाणी असंख्य प्रवासी प्रवास करीत असतात. यामध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. रोज जवळपास २० ते २५ बसेस या मार्गावर वाहतूक करीत असतात. महाडसाठी वरंध भोरमार्गे पुणे हा मार्ग जवळचा असुन जवळपास ४० ते ५० किमीच्या अंतराची व वेळेची बचत होते. मात्र, अतिवृष्टी व घाटातील रस्ता रुंदीकरण कामामुळे महामार्ग विभागाने या घाटातील वाहतूक बंद केली होती. पर्यायी माणगाव ताम्हिणी मार्गे प्रवास करावा लागत असून अंतर अधिक असल्याने प्रवाशांना तिकीटाचा अधिकचा भुर्दंड सोसावा लागत आहे. मात्र, आता पावसाचे प्रमाण कमी झाले असुन, भोर मार्गे वाहतूक देखील सुरू झाली आहे.

याची दखल घेत प्रवाशांच्या सेवेसाठी महाड पत्रकार संघ पुढे आला असुन महाड आगार व्यवस्थापक व महामार्ग विभागाला संघाकडून या बाबतीत निवेदन देण्यात आले आहे. तसेच, गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर लवकरच भोरमार्गे बस वाहतूक सुरू केली जाईल, असे आगार व्यवस्थापक फुलपगारे यांनी सांगितले आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **ऑनलाईन प्रवेश सुरु आहे.** अंगणवाडी शिक्षिका, सुपरवाझर, समाजसेवक, पत्रकार इत्यादी कोर्स प्रवेश देणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा ९०२९२९४८३८/९५१८५६५५१६
- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- **विकणे आहे.** ६३५ SQ.ft चा १BHK Flat पोयनाड एस.टी. थांब्यापासून ५ मिनिटांच्या अंतरावर Contact 8425054720
- Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm
- **महा-ई-सेवा/आधार केंद्राकरीता** अनुभवी कॉम्प्युटर महिला ऑपरेटर पाहिजेत. इंग्रजी, मराठी टायपिंग आणि अनुभवी उमेदवारास प्राधान्य. संपर्क : श्री वरद ऑनलाईन सर्व्हिसेस. शंकर-पार्वती अपार्टमेंट समोर, शेतकरी भवन रोड, चेंढरे, अलिबाग लिव्ह अँड लायसन्स/ऑनलाईन रेंट ॲग्रीमेंट सर्व्हिस उपलब्ध. मो. ८३०८०२२६६४, (व्हाटसॲप) ७३८५६११२९१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जगातील पहिला छत्रपतींचा धनुर्धारी पुतळा

# उंबरखिंडीचा इतिहास जिवंत होणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खोपोली वाकण फाटा येथील उंबरखिंडीत १६६१ मध्ये पराक्रम घडला होता. ३६३ वर्षापूर्वी अंबानदीच्या या खोऱ्यात छत्रपती शिवाजी महाराज यांनी गनिमी काव्याने कारतलबखान उझबेग आणि रायबाघन पाटील यांच्यासह आलेल्या मुघल सैन्याला कोणत्याही मराठा सैनिकाचा बळी न जाता विजय मिळविला होता. याच ऐतिहासीक विजय मिळवलेल्या उंबर खिंडीत महाराष्ट्र सरकार छत्रपती शिवाजी महाराजांचा धनुर्धारी पुतळा उभा करणार आहे. दरम्यान, या परिसराचा विकास साधण्यासाठी शासनाकडून तब्बल ५३ कोटींची तरतूद देखील करण्यात आली आहे.

आजपासून ३६३ वर्षांपूर्वी म्हणजेच २ फेब्रुवारी १६६१ साली या उंबर खिंडीचे ठिकाण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाले होते. अंबानदीच्या खोऱ्यात आणि सह्याद्रीच्या घेऱ्यात सर्व मावळ्यांच्या साथीमुळे महाराजांनी गनिमी काव्याने कारतलबखान उझबेग व रायबाघन पाटील आणि त्यांच्या समवेत असलेल्या मुघल सैन्याला अक्षरशः लोळवले होते. तर, रायबाघन पाटील ही स्त्री माहूरची होती. त्यांचे खरे नाव सावित्रीबाई उदाराम देशमुख असे आहे. रायबाघन यांचा पती औरंगजेबाच्या सैन्यात त्याची सेवा करताना मरण पावला होता. यामुळे पतीच्या जागी रायबागन रुजू झाल्या आणि पराक्रमाच्या जोरावर पातशाहाची वाघीण म्हणजेच रायबाघन अशी पदवी मिळाली होती.

हे दोघे पेण व नागोठणे असे किनारपट्टीवर वसलेल्या बंदरांना लुटून जाळण्यासाठी तब्बल तीस हजाराची फौज घेऊन निघाले होते. लालमहालातून निघाल्यावर सह्याद्रीतील खडतर मार्गाने कुरवंड्या घाटातून ते कोकणातील तुंगारण्यात आले. यावेळी एक हजार मावळ्यांच्या साथीने महाराजांच्या आदेशाने सरसेनापती नेतोजी पालकरांनी इथे आधीच छावणी टाकली होती. जिथे आज ‘चावणी’ गाव वसले आहे. एका बाजूने स्वतः छत्रपती शिवाजी महाराज तसेच मागच्या बाजूला महारुद्रासारखा उभा असलेला सह्याद्री आणि त्यातून वाट काढत खळखळणारी अंबानदी अशा चारही बाजूंच्या चिमटीत हे दोन सरदार आले आणि घमासान लढाई जुंपली होती. यावेळी एकही मावळा न गमावता ही लढाई मराठ्यांनी जिंकली.

अंबानदीने तो राजांचा पराक्रम पाहिलेला आहे. आजही इथल्या मातीला पवित्र समजले जाते. कारण राजांच्या पदस्पर्शाने ती पावन झालेली आहे. याच विचाराने प्रेरित होऊन राज्य सरकार ऐतिहासिक उंबरखिंड परिसराचे सुशोभीकरण करणार आहे.




### जगातील पहिला धनुर्धारी पुतळा

**महाराष्ट्र शासनाच्यावतीने विकास साधताना उंबर खिंडीत जगातील पहिला धनुर्धारी राजांचा पुतळा उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ५३ कोटींची तरतूद राज्य सरकारने केली असून या प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटींची निधीला मंजुरी मिळाली आहे. तसेच, साऊंड लाईट तसेच गार्डनची व्यवस्था या प्रकल्पात असणार आहे.**

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव

मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन - ४०२ २०४

जावक क्र. - १३६१ दिनांक- ५/९/२०२४

### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत नागांव, ता.अलिबाग, जि. रायगडकडून ग्रामनिधी अंतर्गत खालीलप्रमाणेसाहित्य पुरविठेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

| अ. क्र. | निधीचा स्त्रोत | अंदाजित रक्कम | कामाचे नाव | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | १,५०,०००/- | ग्रा.प. हद्दीतील शाळातील विद्यार्थ्यांना वाटण्यासाठी वह्या खरेदी करणे. | ६ महिने |

१) निविदे/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि.०९/०९/२०२४ ते १३/०९/२०२४ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/ दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) कोणत्याही नामंजूर निविदा/दर पत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठल्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/ दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
५) यासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/दरपत्रके किंवा सर्व निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/ दरपत्रके दि.१८/०७/२०२४ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
**सौ. श्वेता राज कदम**
ग्रामविकास अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नागांव
ता. अलिबाग, जि. रायगड

सही/-
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत नागांव

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मान तर्फे झिराड, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक विश्वनाथ सखाराम म्हात्रे, विश्वास सखाराम म्हात्रे, संगिता अशोक पाटील, सौ. दिपा उर्फ मेघा मधुकर ठाकुर, अलका जगन्नाथ म्हात्रे, तेजस्वीनी अंकुश पाटील, अनिकेत जगन्नाथ म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मानतर्फे झिराड ता. अलिबाग | १९ | जिरायत ०-०७-१०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकुण ०-०७-६० | ०.३४ |

वर नमुद जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०५/०९/२०२४
मोबा. ९८२२०१७१६९

सही/-
**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
मु. भुते, पो. थळ
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री सुभाष कन्हैयालाल हिवरकर, रा. कान्हेरी, अकोला, ४४४३०२, श्री. रमेशसिंह हरिसिंह ठाकुर व सौ. रेखा रमेश सिंह, रा. ७०१, मोराज रिव्हर साईड पार्क, बिल्डींग नं. एस ६, गोदरेज कॉलनी जवळ, पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १/२ | ०.३१.००<br>पो.ख.०.०७.०० | ०.१९ | श्री. राहुल सुरेंद्र कामत. |
| १/३/अ | ०.८१.००<br>पो.ख.०.०५.०० | ०.६९ | श्री. राहुल सुरेंद्र कामत - |
| १/३/ब | ०.८४.००<br>पो. ख. ०.०५.०० | १.०० | श्री. राहुल सुरेंद्र कामत. |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०६/०९/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, '' पुष्प विमल '' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| धोकवडे | ९२२/२ | ०-०५-१० | ०.१० | १) श्री. प्रभाकर गोपाळ म्हात्रे.<br>२) श्री.कौशिक चंद्रकांत शापरीया,<br>३) सौ. हर्षा कौशिक शापरीया, |

पैकी श्री. प्रभाकर गोपाळ म्हात्रे यांचा अविभक्त हिस्सा.

श्री. प्रभाकर गोपाळ म्हात्रे यांचे सदर मिळकतीमधील मालकीहक्क निर्वेध असून त्यांना अविभक्त हिस्सा विकणेचा हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या अविभक्त हिश्यावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर अवभिक्त हिस्सा हा विद्यमान मालकांचा निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांचा आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०६/०९/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील सर्व्हे नं. १५ हि.नं ४ अे, या मिळकतीमधील बिनशेती प्लॉट नं. ३, एकूण क्षेत्र ५५१ चौ.मी. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या अमोघ पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे हया इमारतीमधील रेज्ड तळमजल्यावरील निवासी सदनिका नं. १०२ (ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. १६६१/२) क्षेत्र ६१७ चौ. फुट बिल्टअप (४४० चौ. फूट कार्पेट) ही प्रशांत प्रकाश पाटील यांचे नावे व ताबेकब्जात असलेली सदनिका विकत घेण्याचे ठरविले आहे.

संदर्भित निवासी सदनिका मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. तरी संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, अखत्यारपत्र, बक्षिस, ताबा, बोजा, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन आमची खात्री पटवून दयावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ५.९.२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८२२१८६७४०

## अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि.

**अलिबाग-रायगड.**

### ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांकरिता)**

अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.च्या सर्व सभासदांस सूचना देण्यात येते की, अलिबाग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. ची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २४-०९-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटी, सेंन्ट्रल ऑफीस, वेश्वी, अलिबाग येथील सभागृहात बँकेच्या अध्यक्षा मा.सौ. सुप्रिया जयंत पाटील यांचे अध्यक्षतेखाली भरणार आहे. सभेपुढे पुढील विषयांचे कामकाज होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील विषय**

१) मागील दिनांक ०८-०९-२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने वैधानिक लेखापरीक्षक यांचे अहवालासह सादर केलेली सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाची ताळेबंद व नफा तोटा पत्रके स्वीकृत करणे.
३) सन २०२३-२०२४ सालचा अहवाल वाचून मंजुरी देणे व संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४) सन २०२२-२०२३ च्या वैधानिक लेखा परीक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२४-२०२५ सालाकरिता वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे व त्यांची ऑडीट फी ठरविणे.
६) सन २०२३-२०२४ चे अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२४-२०२५ करिता मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत/करंट हिशोब तपासणीस यांची नेमणूक करणे.
८) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
९) मा. संचालक मंडळ सभेपुढे ठेवेल अशा कामांचा विचार करणे.
१०) सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा क्षमापित करणे.
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

अलिबाग
दिनांक :- ०४-०९-२०२४

सही/-
**(बी.सी.मोरे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सूचना :**
१) ज्या सभासदांना काही सूचना करावयाच्या असतील अगर प्रश्न विचारायचे असतील त्यांनी आपल्या सूचना किंवा प्रश्न सभेच्या तारखेच्या सात दिवस अगोदर बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पाठवाव्यात.
२) गणसंख्येच्या (कोरम) अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल. सदर सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
३) या सभेची नोटीस बँकेच्या सर्व शाखांमध्ये लावण्यात आलेली आहे तसेच वार्षिक अहवालाच्या प्रती वाचण्यासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत.

अर्जदारातर्फे ॲड. वैभव गि. पाटील

## अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयांत

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३९/२०२४
नि.नं.७
ने.ता.२४-०९-२०२४

१) श्री. निलेश अनंत कडू,
वय : ५० वर्षे, धंदा : व्यवसाय,
रा.मु.घर क्र. १२६५, मारुती नाका, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
आधार नं. ३२४९९०२७५६०१
पॅन नं. AWEPK6287D
२) सौ. निलिमा सुहास तांबट — अर्जदार
(पुर्वाश्रमीची निलिमा अनंत कडू)
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी,
रा.मु.शुमकामना को.ऑप. हौसींग सोसायटी बिल्डींग
शंकर मंदिराजवळ, यशोधन नगर ठाणे महाराष्ट्र ४००६०६
आधार नं. २५०९२८२०८८५६
पॅन नं. AEEPT5512L

विरुद्ध,

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार नं.१ व २ यांची आई कै. विभा अनंत कडू ह्या दिनांक ०७-१२-२०२३ रोजी मयत झालेल्या असून कै. विभा अनंत कडू यांचे अर्जदार हे अलिबाग येथील नगरपालिका हद्दीतील कुबेराक्षे सोसायटीमधील तळमजल्यावरील गाळा क्र. २०, क्षेत्र १२१ चौ.फुट, तळमजल्यावरील गाळा क्र. २१ क्षेत्र १०७ चौ.फुट, चौथ्यामजल्यावरील निवासी गाळा क्र. ए-४०७,क्षेत्र ३३६ चौ.फुट व तिसरा मजला निवासी गाळा क्र.बी-३०५ क्षेत्र २८४ चौ.फुट या मिळकती आहेत. याकरिता अर्जदार यांच्या नावे वारस दाखला मिळणेकरीता इंडियन सक्शेशन ॲक्ट १९२५ चे कलम ३७२ अन्वये या न्यायालयाकडे दि. २४-०७-२०२४ रोजी अर्ज केलेला आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करण्याची असल्यास अशा लोकांनी दि. २४-०९-२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात स्वत: अगर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि. २४-०९-२०२४ रोजी अगर तत्पुर्वी सदर वारस दाखला देणेबाबत अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २ माहे ०९ २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग-रायगड**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग-रायगड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

**Anjuman Islam JanjiraMurud, MurudJanjiraRaigad**
**REQUIRES**

Applications are invited for the post of ShikshansSevak (Clear Vacancy) from candidate for the following Aided High School.

| Sr. No. | Name of School | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Anjuman Islam Janjira High School& Jr. College Shriwardhan | One Post 6th to 8th | TET/CTET Peper 2 B.Sc, B.Ed |

Apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam JanjiraMurud.
**Email Id: aijheadoffice1907@gmail.com**
**Note:** After Scrutiny of all applications received only those candidate will be informed of the **"Walk in interview"** who satisfy of all the norms and qualification.

**Gen Secretary**
Anjuman Islam JanjiraMurud

## पाली नगरपंचायत, पाली

स्थापना: ३१ डिसेंबर, २०२०
दुरध्वनी क्र. ०२१४२-२४२२४३
मु.पो. पाली, ता. सुधागड, जिल्हा - रायगड पिनकोड - ४१० २०५.
ई मेल आय डी - palinagarpanchayat2021@gmail.com

जा.क्र./ई-निविदा/८७८/२०२४ दिनांक ०५/०९/२०२४

**शुध्दीपत्रक**

### ई- निविदा सुचना सन-२०२४-२५

पाली नगरपंचायत पाली, चे बांधकाम विभागकडील ई-निविदा सूचना जा.क्र.पा.न.पं./बांध/ई-निविदा/८३७ दि.३.०९.२०२४ व जा.क्र.पा.न.पं./बांध/ई-निविदा/८३९ दि.०३.०९.२०२४ मधील कामासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदाराकडून ब-१ नमुन्यातील द्विलीफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यांत येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०६/०९/२०२४ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेत स्थळावर प्रसिध्द करणेंत येईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**पाली नगरपंचायत, पाली**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये रणजीत प्रभाकर राणे (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि /किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि / किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि / किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - टेकाळी तालुका - अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९५, एकूण क्षेत्र १-१४-०० (हे.आर.चौ.मी.) आकार १ रु. ८४ पै.पैकी क्षेत्र ०-४०-५० (हे.आर.चौ.मी.) आकार ० रु.६५ पै.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ०५/०९/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १५८/२०२४

### जाहिर नोटीस

प्रति,
श्रीम. लैला काशिनाथ निशानदार — अर्जदार
रा. मु. एकदरा पो. राजपुरी ता. मुरुड जि. रायगड,

विरुध्द

ग्रामविकास अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत एकदरा, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. लैला काशिनाथ निशानदार यांचा जन्म दि. १८/०९/१९८१ रोजी राहत्या घरी मौजे एकदरा, ता. मुरुड- जंजिरा जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत एकदरा, कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्रीम. लैला काशिनाथ निशानदार, यांचा दि. १८/०९/१९८१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयांत दि. २४/०९/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३०/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये अभिजित प्रभाकर राणे आणि रणजीत प्रभाकर राणे (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि / किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - टेकाळी तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ९८, एकूण क्षेत्र ०-२६-३० (हे.आर.चौ.मी.) आकार ५ रु.५६ पै.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ०५/०९/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये रणजित प्रभाकर राणे (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकांकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि / किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/ किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - टेकाळी तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ७४, एकूण क्षेत्र ०-२०-२० (हे.आर.चौ.मी.) आकार ४ रु.३७ पै.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ०५/०९/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहिर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मिळकतखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत श्रीमती मनोरमा मणिराम पाटील, श्रीमती सुषमा मणिराम पाटील, श्रीमती मनिषा मणिराम पाटील, श्रीमती योगिता मणिराम पाटील, श्रीमती विमल मणिराम पाटील, श्री. संतोष मणिराम पाटील, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती मनोरमा मणिराम पाटील, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझ्या अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| मिळकतखार, ता.अलिबाग. | ६२/२ | ०-२८-१० एकूण | २-७५ |

अलिबाग,
दिनांक : ०५/०९/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**निवडक**

## जडेजा भाजपाच्या संघात

**गुजरात :** भारतीय क्रिकेट संघाचा ऑलराऊंडर रवींद्र जडेजाने राजकारणात एन्ट्री केली आहे. जडेजा भारतीय जनता पक्षाचा सदस्य बनला आहे. रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा गुजरातमधील जामनगर मतदार संघात भाजपची आमदार आहे. रिवाबाने सोशल मीडियावर फोटो शेअर करत याची माहिती दिली आहे. जडेजाने नुकतीच टी वर्ल्ड कप २०२४ मधून निवृत्तीची घोषणा केली होती. आता रवींद्र जडेजा अधिकृतरित्या भाजपचा सदस्य झाला आहे.

## ईशान संघातून आऊट

**मुंबई :** विकेट किपर फलंदाज ईशान किशनचे टीम इंडियात पुनरागमन होणे आता अवघड झालं आहे. मागील वर्षी टीम इंडियातून बाहेर पडल्यावर ईशानचं बीसीसीआय सोबतच कॉन्ट्रॅक्ट सुद्धा रद्द करण्यात आलं होतं. देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार परफॉर्मन्स करून ईशान पुन्हा टीम इंडियात येण्याची संधी शोधत होता. मात्र, दुखापतीमुळे त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. दुखापतीमुळे ईशान किशन दुलीप ट्रॉफीमधून बाहेर पडला. त्याच्या जागी संजू सॅमसनची निवड झाली आहे.

## नॅथनने केली वकीली

**सिडनी :** ऑस्ट्रेलियन फिरकीपटू नॅथन लायनने ३ सामन्यांच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलची वकीली केली आहे. मला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी ३ सामन्यांची मालिका बघायची आहे. यामुळे संघांना वर्चस्व दाखवण्याची आणि मालिका ३-० ने जिंकण्याची संधी मिळू शकते. ३६ वर्षीय अनुभवी फिरकीपटूने आयसीसीला सांगितले की, एका सामन्याऐवजी एकापेक्षा जास्त सामन्यांचा अंतिम सामना कसोटी क्रिकेटला अधिक अचूकता देईल.

## पाकिस्तान ८ व्या क्रमांकावर

**मुंबई :** आयसीसी कसोटी क्रमवारीत पाकिस्तान संघ आठव्या क्रमांकावर घसरला आहे. बांगलादेशविरुद्धच्या मालिकेतील पराभवामुळे त्याचे दुसरे स्थान कमी झाले आहे. सध्या पाकिस्तानचे ७६ रेटिंग गुण आहेत. १९६५ नंतर पाकिस्तानी संघाचे हे सर्वात कमी रेटिंग आहे. बुधवारी जाहीर झालेल्या क्रमवारीत भारतीय संघ १२० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर ऑस्ट्रेलिया १२४ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच संघाने बांगलादेशविरुद्ध मालिका गमावली आहे. त्याचा चांगलाच फटका बसला आहे.

## आयपीएल मुल्यांकन घसरले

**नवी दिल्ली :** गेल्या चार वर्षांत प्रथमच इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) मुल्यांकनात घसरण झाली आहे. एका वर्षात लीगचे मूल्य १०.६% ने घसरले आहे. २०२३ मध्ये आयपीएलचे एकूण मूल्य ९२.५ हजार कोटी रुपये होते. २०२४ मध्ये ते ८२.७ हजार कोटी रुपये राहीले. मुंबई इंडियन्स अव्वल आहे, तर चेन्नई सुपर किंग्जला दुसरे स्थान मिळाले आहे. व्हॅल्युएशन सर्व्हिस प्रोव्हायडर फर्मच्या अभ्यासातून ही माहिती समोर आली आहे. महिला प्रीमियर लीगचे मूल्य वाढले आहे. एका वर्षात ८% वाढ झाली आहे.

# विराटने भरला 66 कोटी रुपयांचा कर

## धोनी दुसऱ्या, तर तेंडुलकर तिसऱ्या स्थानी



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**भारतात क्रिकेट हा सर्वाधिक लोकप्रिय आणि फॉलो केला जाणारा खेळ आहे. क्रिकेटप्रमाणेच चाहत्यांमध्ये भारतीय क्रिकेटपटूंचेही तितकेच वेड आहे. क्रिकेटपटू हे क्रिकेट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करत असतात. त्याचबरोबर आयपीएल आणि इतर विविध लीग सामन्यांमुळे मोठी कमाई होते. यासह बक्कळ कमाई करणारे खेळाडू कर किती भरतात हा देखील एक उत्सुकतेचा मुद्दा आहे. फॉर्च्यून इंडियाच्या यादीनुसार २०२३-२४ मध्ये सर्वाधिक कर भरणाऱ्या यादीत विराट अव्वल ठरला आहे. त्यापाठोपाठ धोनी आणि तेंडुलकरचा समावेश असल्याचे समोर आले आहे.**

भारताचा रन मशीन विराट कोहलीने सर्वाधिक तब्बल ६६ कोटी रुपयांचा कर भरला आहे. विराट कोहलीचे वार्षिक उत्पन्न १९०० कोटींपेक्षा जास्त आहे. तर २०२३-२४ मध्ये कोहलीने ६६ कोटी रुपयांचा कर भरला आहे. जो एखाद्या क्रिकेटपटूने भरलेला सर्वाधिक कर आहे.

टीम इंडियाचा माजी कर्णधार एमएस धोनीने २०२३-२४ मध्ये ३८ कोटी रुपयांचा कर भरला आहे. धोनी या वर्षी सर्वाधिक कर भरणारा दुसरा भारतीय क्रिकेटपटू आहे. भारताचा माजी महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर हा तिसरा सर्वाधिक कर भरणार भारतीय क्रिकेटपटू आहे.

सचिनची एकूण संपत्ती १४३६ कोटी रुपये आहे. तर २०२३-२४ मध्ये सचिन तेंडुलकरने २८ कोटी रुपयांचा कर भरला आहे. तर या यादीत सौरव गांगुली चौथ्या स्थानी असून त्याने २०२३-२४ साठी २३ कोटी कर भरला आहे, तर हार्दिक पंड्याने १३ कोटी कर भरला आहे.

भारतीय सेलिब्रिटींमध्ये सर्वाधिक कर भरण्याच्या बाबतीत अनुक्रमे शाहरुख खान, तामिळ अभिनेता विजय, सलमान खान आणि अमिताभ बच्चन यादीत पहिल्या ते चौथ्या स्थानी आहेत. शाहरुखने ९२ कोटी, विजयने ८० कोटी, सलमानने ७५ कोटी आणि अमिताभ बच्चन यांनी ७१ कोटींचा कर भरला आहे.

# सातव्या दिवशी भारताने केली चार पदकांची कमाई

## दोन सुवर्ण, दोन रौप्य पदकं घातली खिशात

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

येथे सुरू असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय पॅरा ॲथलीट सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करताना दिसत आहेत. ४ सप्टेंबर म्हणजेच सातव्या दिवशी भारताने दोन सुवर्णपदके आणि २ रौप्यपदक पटकावली आहेत. भारताने पहिल्यांदाच पॅरा तिरंदाजी आणि क्लब थ्रोमध्ये सुवर्णकामगिरी केली. तर गोळाफेकमध्ये भारताने ४० वर्षांनंतर पदक पटकावले. मराठमोळ्या सचिन खिलारीने सातव्या दिवशी पदकांचा सिलसिला सुरू केला. भारताच्या सचिन खिलारीने पुरुषांच्या गोळा फेक ४६ प्रकारात रौप्य पदक जिंकले आहे. यानंतर भारताच्या हरविंदर सिंहने पॅरा तिरंदाजी सिंगल्समध्ये सुवर्णपदक पटकावले. तर भारताच्या धर्मबीरने क्लब थ्रोच्या ५१ प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. याच स्पर्धेत प्रणव सुरमाने रौप्यपदक पटकावले आहे. सचिन खिलारीने पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात रौप्य पदक जिंकले आहे. या रौप्य पदकासह, सचिन ४० वर्षांत पॅरालिम्पिक मध्ये गोळाफेक प्रकारात पदक जिंकणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला आहे. यापूर्वी १९८४ मध्ये भारताने पुरुषांच्या गोळाफेकमध्ये पहिले पदक जिंकले होते.



आपल्या क्रीडा कौशल्यासोबतच मेकॅनिकल इंजिनीयर म्हणून शैक्षणिक क्षेत्रातही यशसंपादन केले आहे. तो वेगवेगळ्या संस्थांमध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणून काम करतो, विद्यार्थ्यांना त्यांच्या आणि परीक्षेच्या तयारीत मदत करतो.

हरविंदर सिंहने तिरंदाजीत सुवर्णपदक जिंकण्यात यश मिळविले आहे. हरविंदरने पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह सुवर्णपदकाच्या अंतिम सामन्यात पोलंडचा पॅरा ॲथलीट लुकास सिझेक याचा सलग तीन सेटमध्ये पराभव करून पदक जिंकण्यात यश मिळविले. पॅरिस ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिकमधील तिरंदाजीमधील भारताचे हे पहिले पदक आहे.

हरविंदर सिंगची चमकदार कामगिरी सुवर्णपदकाच्या सामन्यात पाहायला मिळाली. ज्यात त्याने पहिला सेट २८-२४ अशा गुणफरकाने जिंकला आणि २ महत्त्वाचे गुण मिळवले. यानंतर दुसऱ्या सेटमध्ये हरविंदरने पुन्हा २८ गुण मिळवले आणि प्रतिस्पर्धी २७ गुण मिळवून पिछाडीवर राहिला, त्यामुळे हा सेटही हरविंदरच्या नावावर राहिला आणि त्याने ४-० अशी आघाडी घेतली. तिसऱ्या सेटमध्ये हरविंदरने २९-२५ अशा फरकाने विजय मिळवत २ गुण जमा करत ६-० ने पराभूत केले.

## पीएनपी शाळेच्या विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धेत यश



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत नागाव येथे स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शाळेतील विविध गटातून ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. पीएनपी सायरस पुनावाला स्कुलच्या चित्रकलेच्या शिक्षिका प्रतिभा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम चित्र काढून सिनिअर केजीमधील आराध्या सचिन अंबुलकर गट क्र १ मधुन तिसरा क्रमांक तर आर्या कृष्णा भोईर गट क्रमांक ३ मधुन प्रथम क्रमांकाचे बक्षिसे पटकावले. ग्रामपंचायत नागांवतर्फे प्रमाणपत्र देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

# फ्रिट्झची उपांत्य फेरीत धडक

## महिलांमध्ये नवारो-सबालेन्का एकमेकांसमोर

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

पुरुष गटातअमेरिकेच्या १२ व्या मानांकित टेलर फ्रिट्झ आणि २० व्या मानांकित फ्रान्सिस टियाफो यांनी आपापल्या सामन्यात विजय मिळवत अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले. तर महिला एकेरीच्या उपांत्य लढतीत एमा नवारो आणि अरिना सबालेन्का एकमेकांसमोर असतील.

फ्रिट्झने उपांत्यपूर्व सामन्यात अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेचा २०२० मधील उपविजेता जर्मनीच्या ॲलेक्झांडरला ७-६ (७-२), ३-६, ६-४, ७-६ (७-३) असे पराभूत केले. चौथ्या मानांकित ॲलेक्झांडरकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. मात्र, त्याला चमक दाखवता आली नाही. पहिला सेट फ्रिट्झने जिंकल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये विजय नोंदवत त्याने सामना बरोबरीत आणला. यानंतर फ्रिट्झने सलग दोन सेटमध्ये विजय मिळवताना ॲलेक्झांडरला पुनरागमन करण्याची कोणतीच संधी दिली नाही. अन्य उपांत्यपूर्व सामन्यात टियाफोने तीन वर्षांत दुसऱ्यांदा स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. ग्रिगोर दिमित्रोवने उपांत्यपूर्व सामन्याच्या चौथ्या सेटमध्ये सामन्यातून माघार घेतल्याने टियाफोला पुढे चाल मिळाली. दिमित्रोवने माघार घेतली तेव्हा टियाफो ६-३, ६-७ (५-७),६-३, ४-१ असा आघाडीवर होता. महिला गटात १३ व्या मानांकित अमेरिकेच्या नवारोने स्पेनच्या पॉला बडोसावर ६-२, ७-५असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवला. नवारोने प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. गेल्या सामन्यात तिने गतविजेत्या कोको गॉफला पराभूत केले होते.



नवारोने पहिला सेट जिंकत आघाडी घेतली. यानंतर दुसऱ्या सेटमध्ये तिला बडोसाकडून आव्हान मिळाले. मात्र, निर्णायक कामगिरी करत तिने विजय नोंदवला. अन्य उपांत्यपूर्व सामन्यात सबालेन्काने सातव्या मानांकित चीनच्या किनवेन झेंगला ६-१, ६-२ असे सरळ सेटमध्ये नमवले. ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेची विजेती सबालेन्काचा प्रयत्न वर्षातील दुसरा व एकूण तिसरे ग्रँडस्लॅम जेतेपद मिळवण्याचा आहे. त्यामुळे चाहते खुश आहेत.

# न्यूझीलंडचा क्रिकेट संघ भारत दौऱ्यावर

## अफगाणिस्तान बरोबर खेळणार कसोटी



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा क्रिकेट संघ मोठ्या कालावधीनंतर भारत दौऱ्यावर आला आहे. गुरुवारी सकाळी किवी संघ भारतात दाखल झाला. पण, न्यूझीलंडचा संघ भारताविरुद्ध खेळणार नाही. अफगाणिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात एकमेव कसोटी सामना होणार आहे. अफगाणिस्तानचा संघ आधीच भारतात आला असून आता न्यूझीलंडच्या आगमनाने सामन्याच्या तयारीला आणखी वेग आला आहे.

नोएडा येथे ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या सामन्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नोएडा हे अफगाणिस्तानच्या संघाचे होम ग्राउंड बनले आहे. या कसोटी सामन्यासाठी टीम साऊदी न्यूझीलंडच्या संघाचे नेतृत्व करत आहे. किसोटीसामना अफगाणिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात होणार असला तरी हा सामना वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा भाग असणार नाही. त्यामुळे या सामन्यातील विजय किंवा पराभवाचा क्रमवारीवर कोणताही परिणाम होणार नाही. अफगाणिस्तानच्या संघाने यापूर्वी देखील नोएडा येथे सामना खेळला आहे. ज्यामध्ये संघाच्या खेळाडूंची कामगिरी चांगली दिसली होती. यावेळी संघाची कमान हशमतुल्ला शाहिदीच्या हाती आहे. मात्र संघाचा स्टार खेळाडू राशिद खान सामन्यातून बाहेर पडल्याने संघाला मोठा धक्का बसला. अफगाणिस्तानचा संघ- हशमतुल्ला शाहिदी (कर्णधार), इब्राहिम झादरान, रियाझ हसन, अब्दुल मलिक, रहमत शाह, बहीर शाह मेहबूब, इक्रम अलीखेल, शाहिदुल्ला कमाल, गुलाबदिन नायब, अफसर झझाई, अजमतुल्ला उमरझई यांच्यासह अन्य खेळाडू आहेत. न्यूझीलंडचा संघ-टीम साऊदी (कर्णधार), टॉम ब्लंडेल, मायकेल ब्रेसवेल, डेव्हॉन कॉनवे, मॅट हेन्री, टॉम लॅथम, डॅरिल मिशेल, विल ओरुर्क, एजाज पटेल, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सॅंटनर, बेन सियर्स, केन विल्यमसन, विल यंग यांच्यासह अन्य खेळाडूंचा समावेश आहे. या सामन्याची प्रेक्षक आतुरतेने वाट पहात आहेत.

# ध्रुवने हवेत उडून पकडला अफलातून झेल

**। मुंबई । वृत्तसंस्था।**

देशांतर्गत क्रिकेटमधील महत्त्वपूर्ण आणि अनेक स्टार क्रिकेटर्सचे भविष्य ठरवणाऱ्या दुलिप करंडक स्पर्धेला सुरुवात झाली आहे. इंडिया ए आणि इंडिया बी यांच्यातील सामना बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरु आहे. या सामन्याच ध्रुव जुरेलने अभिमन्यू ईश्वरनचा हवेत उडून अफलातून झेल घेतला आहे.शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील ए संघाने टॉस जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे इंडिया बी संघ पहिल्यांदा बॅटिंगसाठी मैदानात उतरला. या संघाचे नेतृत्व अभिमन्यू ईश्वरन करतोय. यशस्वी जयस्वालच्या साथीनं कॅप्टन अभिमन्यू यानेच इंडिया बी संघाच्या डावाला सुरुवात केली. ही जोडी अगदी संयमीरित्या डाव पुढे नेताना दिसली. पण अवघ्या ३३ धावांवर आवेश खाननं इंडिया बी संघाला पहिला धक्का दिला. इंडिया अ संघाकडून खेळणाऱ्या आवेश खान याने प्रतिस्पर्धी संघातील कॅप्टन अभिमन्यू ईश्वरन याला आपल्या जाळ्यात अडकवले. त्याने ४२ चेंडू खेळून संघाच्या धावंसख्येत फक्त १३ धावांची भर घातली. ईश्वरन याची विकेट आवेश खानच्या खात्यात जमा झाली, असली तरी विकेट मागे ध्रुव जुरेल याने दाखवलेली चपळाई चर्चेचा विषय ठरली. त्याने हवेत उडी मारून कमालीचा कॅच पकडला. हा कॅच सर्वोत्तम कॅचपैकी एक आहे. ध्रुव जुरेल हा एक प्रतिभावंत क्रिकेटर आहे. आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यातून खेळताना दिसलेल्या या विकेट किपर बॅटरनं भारतीय संघाकडून ३ कसोटी सामन्यासह दोन टी-२० सामनेही खेळले आहेत. इंडिया बीच्या कॅप्टननं तंबूचा रस्ता धरल्यावर यशस्वी जयस्वालही चालता झाला.



## महिला खेळाडूची प्रियकराने केली हत्या

**पॅरिस :** ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या महिला खेळाडूची तिच्या प्रियकराने हत्या केली. ऑलिम्पिकपर्यंत मजल मारणारी खेळाडू रेबेका चेपतेगी जीवनाची लढाई हरली आहे. खरे तर युगांडाची धावपटू रेबेका हिला तिचा प्रियकर डिक्सन एनडेमाने पेट्रोल टाकून जिवंत जाळले. तिच्या शरीराचा ८० टक्के भाग भाजल्याने तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या हल्ल्यानंतर रेबेकाला केनियातील रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तिने गुरुवारी अखेरचा श्वास घेतला. ३३ वर्षीय रेबेकाने गेल्या महिन्यात पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मॅरेथॉन मध्ये भाग घेतला होता. दरम्यान, रेबेकावर रविवारी तिच्या प्रियकराने हल्ला केल्यानंतर तिच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. डॉक्टरांनी तिला वाचवण्याचा खूप प्रयत्न केला, पण रेबेकाला मोठी जखम झाली असल्याने तिचा जीव वाचला नाही. ऑलिम्पियन आणि तिचा प्रियकर यांच्यात जमिनीवरून बराच वाद झाला, त्यानंतर तिच्या प्रियकराने तिच्यावर पेट्रोल ओतून तिला जाळले असल्याचे कळते. एनडेमालाही किरकोळ दुखापत झाली आहे.

## बीसीसीआयची वार्षिक बैठक २९ सप्टेंबरला

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामकमंडळाच्या (बीसीसीआय) वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) सचिव निवडीचा अजेंडा समाविष्ट केलेला नाही. आता नव्या सचिवाची निवड विशेष सर्वसाधारण सभेत होणार आहे.

या संदर्भात मंडळाने सर्व राज्य संघटनांना गुरुवार ५ सप्टेंबर रोजी नोटीस पाठवली आहे. त्यानुसार बोर्डाची वार्षिक बैठक २९ सप्टेंबर रोजी बंगळुरू येथील फोर सीझन हॉटेलमध्ये होणार आहे. या कालावधीत बंगळुरूमध्ये नव्याने बांधलेल्या राष्ट्रीय क्रिकेट केंद्राचेही उद्घाटन केले जाईल. शेवटची बैठक २५ सप्टेंबर २०२३ रोजी गोव्यात झाली होती.

अधिसूचनेनुसार, एजीएच्या अजेंड्यात बीसीसीआय सचिवांच्या निवडीचा उल्लेख नाही. या बैठकीत नव्या सचिवांची निवड होईल, अशी अपेक्षा होती. जय शाह आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष बनले आहेत. त्यामुळे भारतीय मंडळाचे सचिव पद रिक्त होणार आहे.

अशा स्थितीत बीसीसीआयला ३१ डिसेंबरपूर्वी नवीन सचिवांची निवड करावी लागणार आहे. विशेष सर्वसाधारण सभेत नवीन सचिवांची निवड होणार असल्याचे सांगण्यात आले. त्याकडे लक्ष लागले आहे.

## ट्रॅव्हिस हेड, कॅप्टन मिचेल मार्श जोडीचा धमाका....

# ऑस्टेलियाने पॉवर प्लेमध्ये ठोकल्या ११३ धावा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाने स्कॉटलँड विरूद्धच्या पहिल्या टी सामन्यात १५५ धावांचा पाठलाग करताना वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला आहे. ऑस्ट्रेलियाने शून्य धावसंख्येवर पहिली विकेट गमावली. जॅक फ्रेजर-मॅकगर्क पदार्पणातील सामन्यात झिरोवर आऊट झाला. मात्र त्यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि कॅप्टन मिचेल मार्श या जोडीने धमाका केला. या जोडीने पॉवर प्लेच्या ६ ओव्हरमध्ये ११३ धावा ठोकल्या. ऑस्ट्रेलियाने यासह टी २० पॉवर प्लेमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विश्व विक्रम आपल्या नावावर केला. विशेष बाब म्हणजे हेड आणि मार्श या जोडीने पाचव्या आणि सहाव्या ओव्हरमध्ये फक्त चौकार आणि षटकारच ठोकले.

ट्रॅव्हिस हेडने या दरम्यान ऑस्ट्रेलियाकडून वेगवान अर्धशतक ठोकण्याचा कारनामा केला. हेडने अवघ्या १७ बॉलमध्ये अर्धशतक झळकावलं. मिचेल मार्शने पाचव्या ओव्हरमधील पहिल्या बॉलवर सिक्स ठोकला. मार्शने या ओव्हरमध्ये धमाका केला. मार्शने दुसऱ्या बॉलवर सिक्स खेचला. तिसऱ्या बॉलवर चौकार लगावला. त्यांतर मार्शने चौथ्या चेंडूवर षटकार फटकावला. मार्शने पाचव्या आणि सहाव्या बॉलवर चौकार ठोकले आणि एका ओव्हरमध्ये ३० धावा केल्या. त्यानंतर ट्रॅव्हिस हेडने सहाव्या ओव्हरमध्ये झंझावाती खेळी केली.



हेडने सहाव्या ओव्हरमध्ये अनुक्रमे ६,६,४,६,४,४ अशी फटकेबाजी करुन २६ धावा केल्या. अशाप्रकारे मार्श आणि हेड या दोघांनी २ ओव्हरमध्ये ५६ धावा केल्या.

हेडने त्याआधी चौथ्या ओव्हरमधील शेवटच्या २ चेंडूवर षटकार आणि चौकार ठोकून १० धावा केल्या होत्या. अशाप्रकारे ऑस्ट्रेलियाने १४ बॉलमध्ये ६६ धावा केल्या. दरम्यान, हेड आणि मार्श या जोडीने केलेल्या स्फोटक खेळीच्या जोरावर १५५ धावांचं आव्हान हे ९.४ ओव्हरमध्ये ३ विकेट्स गमावून सहज पूर्ण केलं. हेडने २५ बॉलमध्ये ८० रन्स केल्या. तर मार्शने १२ चेंडूत ३९ धावांचं योगदान दिलं. जोस इंग्लिसने १३ चेंडूत नाबाद २७ धावा केल्या. तर स्टोयनिसने नाबाद ८ धावा केल्या.

स्कॉटलँड प्लेइंग ईलेव्हन: रिची बेरिंगटन (कर्णधार), जॉर्ज मुन्से, ओली हेयर्स, ब्रँडन मॅकमुलेन, मॅथ्यू क्रॉस, मायकल लीस्क, मार्क वॉट, जॅक जार्विस, चार्ली कॅसेल, जॅस्पर डेविडसन आणि ब्रॅड व्हील.ऑस्ट्रेलिया प्लेइंग ईलेव्हन: मिचेल मार्श (कॅप्टन), ट्रॅव्हिस हेड, जॅक फ्रेजर-मॅकगर्क, जोश इंग्लिस, मार्कस स्टोयनिस, टीम डेव्हिड, कॅमरून ग्रीन, सीन एबॉट, झेवियर बार्टलेट, एडम झॅम्पा आणि रिले मेरेडिथ यांचा समावेश होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)